# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ / फाल्गुन २९, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मौजे न्हावा खाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांना सिडको प्रशासनाने संपादित केलेल्या जमिनीचा लाभ दिला नसल्याबाबत

**(१) * ११४७६० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे न्हावा खाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांना विविध विकास कामांसाठी संपादित केलेल्या जमिनीचा सिडको प्रशासनाकडून अद्याप कोणताही लाभ देण्यात आला नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा निवाडा क्र.२/९४ सन २००४ मध्ये मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १४ वर्षांचा कालावधी होऊन देखील व शेतकऱ्यांनी संबंधित विभागांशी वारंवार संपर्क साधूनही निवाड्याबाबत कोणत्याही प्रकारचा अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतक-यांवर झालेला अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने त्यांना लाभ देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मौजे न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील भूसंपादनाच्या अनुषंगाने निवाडा क्र.२/९४ यामध्ये एकूण २१५ प्रकरणे असून सदर निवाडा दि.२७/०२/२००४ रोजी सामाईकरित्या जाहीर करण्यात आला आहे. सदर निवाडा सर महंमद युसूफ हाजी इस्माईल ट्रस्टच्या नावे करण्यात आलेला असून त्यामध्ये अनधिकारे बदल करुन सदर निवाडा उर्मीश उदानी यांच्या नावे करण्यात आलेला असल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दि.९/११/२०१२ च्या पत्रान्वये सिडकोला कळविण्यात आले. त्यानुसार श्री.उर्मीश उदानी यांना केलेले भूखंडवाटप सिडकोकडून रद्द करण्यात आले व या निवाड्याअंतर्गत समाविष्ट सर्व प्रकरणात भूखंड वाटपास स्थगिती देण्यात आली.

भूखंडवाटप रद्द करण्याच्या सदर आदेशाविरुध्द श्री.उर्मेश उदानी यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१००६६/२०१३ दाखल केली असून त्यावर मा.उच्च न्यायालयाने "जैसे थे" आदेश पारीत केले आहेत.

सदर प्रकरणी निवाड्यातील ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन वाद प्रलंबित नाहीत अशा प्रत्येक प्रकरणाच्या मालकी हक्काबाबत तपासणी करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण विभाग तसेच सिडको यांच्या स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहुल (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील इमारतींमधील घरांची परस्पर विक्री झाल्याबाबत

**(२) * ११२२८१ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नाले, रस्ते, रेल्वे व अन्य विकास प्रकल्पांमुळे बाधीत होणाऱ्या झोपडीधारकांसाठी चेंबूरच्या माहुल परिसरातील महानगरपालिकेच्या ताब्यातील ४६ इमारतींमधील जवळपास २०० घरांची परस्पर विक्री झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट दस्तऐवज करून ही घरे विकण्यात आली असून सदर प्रकरणी रुपये १५ कोटींपेक्षा जास्त गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे काय, त्यानुसार फसवणूक करणा-यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी केली असता, २०० घरांची विक्री झाल्याची बाब खरी नसल्याचे आढळून आले आहे.

तथापि, सदर तपासणीत ११ घुसखोरांनी प्रत्यक्ष घुसखोरी केल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

तसेच, "पालिकेच्या घरांची परस्पर विक्री" अशा आशयाची बातमी दिनांक २४.०१.२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) माहुल परिसरातील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील ४६ इमारतींची महानगरपालिकेमार्फत नियमितपणे तपासणी करण्यात येते.

सदर तपासणीदरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदनिकांमध्ये १० घुसखोरांनी कागदपत्रांशिवाय व एका घुसखोराने बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रत्यक्ष घुसखोरी केल्याचे तसेच ७ इसम हे बनावट कागदपत्रांच्या आधारे महानगरपालिकेच्या सदनिका प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आढळून आले.

(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

• घुसखोरी केलेल्या ११ घुसखोरांना महानगरपालिकेच्या सदनिकांमधून तात्काळ निष्कासित करण्यात आले आहे.

• बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरी केलेल्या एक व घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या ७ अशा एकूण ८ इसमांविरुध्द आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे दिनांक १३.११.२०१७, २७.११.२०१७ व २१.१२.२०१७ रोजी तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, त्यांचेवर गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सोलापूर शहरात त्रिपुरा चिटफंडने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(३) * ११५४७६ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात त्रिपुरा चिटफंडमध्ये पैसे गुंतविलेल्या शेकडो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरातील त्रिपुरा चिटफंडाचे कार्यालय बंद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांचे गुंतविलेले पैसे परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सोलापूर शहरात त्रिपुरा चिटफंडने केलेल्या फसवणूकीसंदर्भात फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गु.र.नं. १३३/२०१८ भा.दं.वि कलम ४२०, ४०६, ३४ सह एम.पी.आय.डी. कायदा कलम ३ व ४ अन्वये दि.२७/०२/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात तपासात ५ आरोपींना अटक करुन पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

तपासात त्रिपुरा चिटफंडमध्ये पैसे गुंतविलेल्या ११६ गुंतवणूकदारांची एकूण ३५,३८,४३६/- रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच, तपासात त्रिपुरा चिटफंडचे आवश्यक दस्तऐवज व संगणक संच जप्त करण्यात आला असुन फर्नीचर व इतर साहित्यासह कार्यालय सिल करण्यात आले आहे. तसेच, त्रिपुरा चिटफंडचे विजया बँकेतील खाते गोठविण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कांदिवली पूर्व (मुंबई) येथील शासकीय भूखंडावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याबाबत

**(४) * १०५२१६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांदिवली पूर्व (मुंबई) हनुमान नगर, वडारपाडा येथील हिंदू स्मशानभूमी समोरील १६३ अ/ पै गाव आकुर्ली ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या शासकीय भूखंडावर भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अतिक्रमण केलेल्या भूखंडावर या भूमाफियांकडून बेकायदेशीर व्यवसाय केले जात असल्याचे तसेच याच जागेवर गाळे बनवून त्यांची विक्री करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशांकडून वारंवार तक्रारी करून देखील प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त ठिकाणचे अनधिकृत अतिक्रमण निष्कासीत करुन बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच गाळे बनवून विक्री करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे. अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांच्या अहवालानुसार सदर भूखंडावर भूमाफीयांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमित केली अशी बाब नाही.

सदर शासकीय जागेवर सन २००० नंतर वारंवार होणारी अनधिकृत बांधकामे वेळोवेळी अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांच्या कार्यालयाकडून दि.५.१.२०१७ व दि.२४.३.२०१७ रोजी महाराजस्व अभियानातंर्गत कारवाई करुन निष्कासित करण्यात आली आहेत. अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांच्या कार्यालयाकडून हिंदु स्मशानभूमी समोरील सदर शासकीय जागेवर वारंवार अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत बांधण्यासाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांची मान्यता घेऊन, म्हाडा प्राधिकरणामार्फत संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. परंतु, राजीव गुप्ता यांनी सिटी सिव्हील कोर्ट, दिंडोशी येथे सुट नं.२४३६/२०१७ अन्वये दावा दाखल करण्यात आल्याने संरक्षण भिंत बांधण्याच्या व अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीला मा.सिटी सिव्हील कोर्टाने दि.१.९.२०१७ रोजीच्या आदेशान्वये “जैसे-थे” आदेश दिले आहेत. त्यामुळे सदर जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याबाबत

**(५) * १०५४१७ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराचा वाढता विकास तसेच एमआयडीसी, आय.टी. पार्क, एपीएमसी त्यामुळे लोकसंख्या वाढीचा प्रचंड वेग व त्यामुळे वाहतुकीची होत असलेली कोंडी यासाठी नवी मुंबईत मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेऊन काही उन्नत मार्ग सिडकोने निश्चित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उन्नत मार्गात दिघा, ऐरोली, रबाळे, घणसोली, कोपरखैरणे व वाशी अशा मार्गांचा समावेश करण्यात यावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाने तयार केलेल्या शिफारशीनुसार मार्गिका क्र.१ अंतर्गत येणाऱ्या बेलापूर-खारघर-पेंधर-तळोजा-एमआयडीसी-कळंबोली-खांदेश्वर व पुढे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गावरील बेलापूर ते पेंधर या उन्नत मार्गाचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

(२) व (३) होय.

नवी मुंबईतील बहुपर्यायी परिवहन व्यवस्थेची शक्याशक्यता पडताळणी करण्यासाठी सिडकोने नियुक्ती केलेल्या दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशने सादर केलेल्या शिफारशीत बेलापूर-तळोजा-कळंबोली-खांदेश्वर या मार्गासोबत दिघा-तुर्भे-बेलापूर व वाशी-घणसोली-महापे या मेट्रो छन्न मार्गाचा समावेश केला आहे.

तसेच विधानमंडळ आश्वासनाच्या अनुषंगाने सिडकोने सदर प्रकल्पाच्या फेर सर्व्हेक्षणाचे काम आयआयटी, मुंबई यांना दिले होते. त्यानुसार आयआयटी, मुंबई यांनी दि.२१/१/२०१४ रोजी अहवाल सादर केला आहे. तथापि सद्यस्थितीत प्रस्तुत अहवालावर अंतिम निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण तालुक्यातील (जि.रायगड) प्रकल्पग्रस्त तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी बांधलेल्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(६) * १०९८९४ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) प्रकल्पग्रस्त तरुणांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे याकरिता सिडको प्रशासनाने द्रोणगिरी नोड परिसरात बोकडविरा ग्रामपंचायत हद्दीत लाखो रुपये खर्च करुन प्रशिक्षण केंद्र इमारतीची उभारणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रशिक्षण केंद्रातून अद्यापपर्यंत एकाही प्रकल्पग्रस्ताने प्रशिक्षण घेतलेले नाही तरीही सदर इमारतीच्या दुरुस्तीकरिता आतापर्यंत लाखो रुपयांचा खर्च केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रकल्पग्रस्तांसाठी सन २००९ मध्ये सुरु केलेल्या या प्रशिक्षण केंद्रातून सन २००९ ते २०१३ पर्यंत सुमारे ५०० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले असून लॉजिस्टीक स्किल कौन्सील व नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांच्या सूचनेनुसार सदरहू प्रशिक्षण केंद्रात सिडको व जेएनपीटीमार्फत विविध कौशल्य विकास केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

सदरहू इमारतीच्या काही भागांना तडे गेल्याचे संरचनात्मक परिक्षणाअंती आढळून आल्याने इमारतीच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून इमारतीच्या बाह्य दुरुस्तीवर रु.२३२ लक्ष एवढा खर्च झाला आहे. तसेच सद्यस्थितीत इमारतीचे अंतर्गत दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) येथील श्रीराम मंदिरातील मूर्ती चोरीस गेल्याबाबत

**(७) * ११५४४५ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) येथील श्रीराम मंदिरातील मूर्ती चोरीस गेल्याची बाब २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास रात्री घडल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हयासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व सदर चोरीचा तपास करून गुन्हेगारांना शिक्षा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

दि.२४/०१/२०१८ रोजी मंदिराच्या गाभाऱ्यातील पंचधातुची श्रीकृष्णाची मुर्ती, पद्मावती देवी, लक्ष्मी देवीची मुर्ती, तसेच इतर देवाच्या ६ मुर्ती अशा एकुण ५२,७५०/- रुपये किंमतीच्या मुर्ती अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याबाबत प्राप्त फिर्यादीवरुन रेणापूर पोलीस स्टेशन येथे दि.२४/०१/२०१८ रोजी गु.र.नं. २७/२०१८ भा.दं.वि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळाचा पंचनामा करुन १९ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. श्वानपथक, अंगुलीमुद्रा तज्ञ यांच्या मदतीने तपास करण्यात आला आहे. तसेच, संशयीतांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सँडहर्स्ट रोड ते मस्जिद बंदर स्थानकादरम्यान एका व्यक्तीने फटका मारल्याने लोकलमधून पडून तरुणी गंभीर जखमी झाल्याबाबत

**(८) * ११५२६१ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य रेल्वेवर सँडहर्स्ट रोड ते मस्जिद बंदर स्थानकादरम्यान मोबाईल चोरण्यासाठी ट्रॅकमध्ये उभ्या असलेल्या व्यक्तीने फटका मारल्याने चालत्या लोकलमधून पडून द्रविता सिंह ही तरुणी गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७ मध्ये अशा प्रकाराच्या फटका गँग विरोधात मध्य रेल्वेवर ९५ आणि पश्चिम रेल्वेवर ८७ गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, द्रविता सिंहवर केलेल्या हल्ल्याची आणि सन २०१७ मध्ये मध्य व पश्चिम रेल्वेवर घडलेल्या अशा प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासाची सद्यस्थिती काय आहे,

(४) तसेच अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात सन २०१७ मध्ये खांबावर व ट्रॅकमध्ये उभे राहुन काठी/रॉड सारख्या वस्तुने फटका मारुन चोरी व जबरीने हिसकावणे याबाबत मध्य परिमंडळात १४६ आणि पश्चिम परिमंडळात ५६ असे एकूण २०२ गुन्हे दाखल आहेत.

(३) सदर प्रकरणी सीएसएमटी रेल्वे पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३६२/२०१८ भा.दं.वि. कलम ३०७, ३९४, ४११, ३४ अन्वये ३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असुन, सदर गुन्हा तपासाधीन आहे.

तसेच, सन २०१७ मध्ये अशा प्रकारचे मध्य परिमंडळात एकूण १४६ गुन्हे दाखल असुन त्यातील उघडकीस आलेल्या ३३ गुन्ह्यात ६४ आरोपींना अटक करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. तसेच, ३१ गुन्हे तपासाअंती समरी फायनल करण्यात आले असुन ८२ गुन्हे तपासाधीन आहेत.

त्याचबरोबर पश्चिम परिमंडळात एकूण ५६ गुन्हे दाखल असुन त्यातील उघडकीस आलेल्या ३ गुन्ह्यांचे मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. तसेच, ३५ गुन्हे तपासाअंती समरी फायनल करण्यात आले असुन १८ गुन्हे तपासाधीन आहेत.

(४) अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी सर्व रेल्वे स्थानकांवर फलाट गस्त पथक व गुन्हे प्रतिबंध आणि सुरक्षा पथक ही दोन पथके दिवसा व रात्री नियुक्त करण्यात येतात. नमुद पथके फटका मारुन चोरी/जबरी चोरीचे तसेच रेल्वेवर दगड मारणे यासारखे गुन्हे वारंवार घडणाऱ्या ठिकाणांना भेटी देतात.

तसेच, स्टेशन ड्युटी, मॅसिव्ह फ्लॅश चेकींग व लोकल ट्रेन महिला डबा एस्कॉर्ट अशा माध्यमातुन जास्तीत जास्त पोलीस कर्मचारी नियुक्त केले जातात. रेल्वे पोलीसांद्वारे १५१२ ही रेल्वे पोलीस हेल्पलाईन चालु करण्यात आली असुन त्याद्वारे प्रवाशांच्या तक्रारी, गुन्हे, गुन्हेगार/संशयितांसंदर्भात माहिती प्राप्त करुन त्यांना वेळेवर मदत पुरवणे अथवा त्यावर तात्काळ दखल घेवुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रा.लि. कंपनीतील कामगाराचा झालेला मृत्यू

**(९) * १०९५९८ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील बिल्ट ग्राफिक्स पेपर प्रा.लि. कंपनीत क्लोरीनमिश्रित स्लज मोठ्या प्रमाणात अंगावर पडल्याने त्याखाली दबून एका कंत्राटी कामगाराचा मृत्यू झाला असून तीन कंत्राटी कामगार जखमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत मृत कंत्राटी कामगाराच्या नातेवाईकांना व जखमींना कंपनीकडून आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर घटनेमध्ये एका कामगाराचा मृत्यू व एक कामगार जखमी झाला आहे.

(२) सदर प्रकरणी उपसंचालक, औ. सु. व आ. संचालनालय, चंद्रपूर यांनी चौकशी केली आहे.

(३) चौकशीत असे आढळून आले की, घटनेच्या दिवशी ४ कंत्राटी कामगार टॉवरच्या पाईपलाईनचा व्हॉल्व काढण्याचे (डिस्मेंटल) काम करीत होते. सदर कामादरम्यान टॉवर मध्ये साचलेला जूना कॉस्टीक व परॉक्साईड मिश्रीत पेपर पल्प अर्धवट काढलेल्या व्हॉल्वमधून एकाएकी बाहेर आला व एका कंत्राटी कामगाराच्या अंगावर पडल्यामुळे गुदमरून त्याचा मृत्यू झाला. तसेच एक कामगार जखमी झाला होता. सदर जखमी कामगार अपघातानंतर १२ दिवसांनी कारखान्यात कामावर रूजू झालेला आहे. सदरहू जखमी कामगाराचा संपूर्ण औषधोपचाराचा व दवाखान्याचा खर्च व्यवस्थापनाने दिला आहे.

मृतक कामगार हा राज्य कामगार विमा योजना (ESIC) अंतर्गत नोंदणीकृत असून नियमाप्रमाणे मृतकाचे कायदेशिर वारसदारास अंदाजित पेंशन रू.८०००/- प्रतिमाह मिळणार आहे. याव्यतिरिक्त कारखान्याचे व्यवस्थापनाने मृतकाचे कायदेशीर वारसदारास नुकसान भरपाईची रक्कम रू.८,०६,६४०/- (डि.डि. क्र.२८६२२८, दि.०६/०२/२०१८) आयुक्त, नुकसान भरपाई कायदा, कामगार न्यायालय, चंद्रपूर येथे दि.०६/०२/२०१८ रोजी जमा केली आहे. तसेच व्यवस्थापनाने सानुग्रह अनुदान रू.४,४३,३६०/- चेकव्दारे (क्र. ०५१४७३, दि.१२/०१/२०१८) मृतकाचे कायदेशीर वारसदारास देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षणासाठी खरेदी केलेली मशिनरी वापराविना पडून असल्याबाबत

**(१०) * १०५८८४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षणासाठी खरेदी केलेली रुपये ९ लाख ४८ हजाराची मशिनरी सुमारे दहा वर्षांपासून वापराविना पडून असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षणासाठी पुणे महानगरपालिकेला एकही प्रशिक्षक मिळू शकला नसल्यामुळे लाखो रुपये खर्च करून खरेदी केलेल्या मशिनरी पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्वेलरी डिझाइन प्रशिक्षण, ज्वेलरी फिनिशिंग, ज्वेलरी कास्टिंग, ज्वेलरी मेकिंग, कारागिरीसाठी प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक तज्ज्ञ प्रशिक्षक, अभ्यासक्रमाची रूपरेषा, प्रशिक्षणाचे मूल्यांकन करणारी व्यवस्था व या क्षेत्रातील उद्योजकांची मान्यता असणारे प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था न झाल्याने मशिनरी वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक तज्ञ प्रशिक्षक, अभ्यासक्रमाची रूपरेषा, प्रशिक्षणाचे मूल्यांकन करणारी व्यवस्था व या क्षेत्रातील उद्योजकांची मान्यता असणारे प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था न करता एवढ्या मोठ्या रकमेची माशिनिरी खरेदी करून ती वापराविना ठेवल्याप्रकरणी शासनाकडून संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) • आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षण मिळण्याच्या हेतूने सन २००६ मध्ये रूपये ९.४८ लाख किमतीच्या ज्वेलरी डिझाईन प्रशिक्षण विषयक मशिन्स खरेदी करण्यात आल्या आहेत.

• सदरचे प्रशिक्षण देण्याकरीता तज्ञ प्रशिक्षक, अभ्यासक्रम, प्रशिक्षणाचे मुल्यांकन करणारी व्यवस्था व अन्य मुलभूत सोयींच्या अभावामुळे यंत्रसामुग्री असूनही पुणे महानगरपालिका प्रशिक्षण सुरू करू शकली नाही ही वस्तुस्थिती आहे.

• प्रशिक्षक नियुक्तीबाबत पुणे महानगरपालिकेने वृत्तपत्र जाहिरात देवून प्रयत्न केले होते.

• त्यानुसार सुमारे १० महिने प्रशिक्षण सुरू होते. तथापि, प्रशिक्षका अभावी सदरचे प्रशिक्षण त्यापुढे देणे शक्य झाले नाही.

• पुणे महानगरपालिकेने विविध तज्ञ संस्थांना भेटी देवून प्रशिक्षणासंबंधी माहिती घेण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केलेले आहेत.

• सावित्रीबाई फुले विद्यापिठाकडील स्किल डेव्हलपमेंट सेंटरमार्फत सुरू असलेल्या ज्वेलरी डिझाईन विभागाला सदर मशिनरी देण्याबाबत विद्यापिठातील संबंधीत विभागासोबत सध्या चर्चा सुरू असून पुणे विद्यापिठा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील महिलांना ज्वेलरी डिझाईन प्रशिक्षण विनामुल्य उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• यापुढे कोणतीही खरेदी करताना त्याचा यथोचित वापर होयील याबाबत सूव्यवस्थीत नियोजन करून त्यानंतरच खरेदी करण्यात यावी अशा सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेची पाण्याची व मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्याबाबत

**(११) * ११३१०३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेचे पोलीस वसाहत, शासकीय वसाहती, इमारती व कार्यालयांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पाण्याचे ३२० कोटी ९८ लाख ४३ हजार रुपये थकविल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १७ वर्षांपासून पाण्याची थकबाकी वसूल होण्याऐवजी वाढत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील विकासक, कंपन्या, मोठ्या मॉल्सच्या मालकांनीही महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता कर थकविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कर वसूल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) शासनाच्या विविध विभागांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलआकार देयकांची एप्रिल, २००१ ते ऑक्टोबर, २०१७ अखेरपर्यंतची रु. ३२०.९८ कोटी इतकी थकबाकी आहे ही वस्तुस्थिती आहे.

तसेच, जानेवारी, २०१८ अखेरपर्यंतची थकबाकी रु. ३५६.४८ कोटी इतकी आहे.

थकीत जलआकार देयकांच्या वसुलीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित यंत्रणांशी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) मुंबईतील विकासक, कंपन्या, मॉल्स व अन्य मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणावर मालमता कराची थकबाकी आहे ही वस्तुस्थिती आहे.

सदर मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

- १७,५८५ प्रकरणात मागणीपत्र बजाविण्यात आली आहेत.
- १९६ मालमत्ता मोहोरबंद करण्यात आल्या आहेत.
- ५८ जलजोडणी खंडीत करण्यात आल्या आहेत.
- ७२ प्रकरणी जप्ती व अटकावणीची नोटीस बजावण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये नागरी सुधारणा करताना कच्चामाल व कामाच्या दर्जाचे बनावट प्रमाणपत्रे सादर करण्यात आल्याबाबत

**(१२) * १०४८६६ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष**

**उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये नागरी विकासाच्या सुमारे १२ हजार २३७ कामातील सुमारे १२०० कामांची तपासणी केल्यानंतर गुणवत्ता दर्जा चाचणी केली नसल्याचे तसेच, कच्च्या मालाच्या दर्जाची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याप्रकरणी दक्षता विभागाने म्हाडातील ५६ अधिकाऱ्यांची चौकशी सुरु केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या दक्षता व सुरक्षा विभागामार्फत सुरु असलेल्या चौकशीचा अहवाल म्हाडास प्राप्त झाला आहे काय, त्यानूसार चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षण अहवालात तसेच लोकलेखा समितीच्या शिफारसीनुसार बनावट चाचणी प्रमाणपत्राच्या चौकशी संदर्भात सविस्तर तपासणी म्हाडाच्या दक्षता विभागाकडून करण्यात यावी तसेच चौकशी केल्यानंतर दोषी आढळलेल्या अभियंता/अधिकाऱ्यांवर नियमाप्रमाणे उचित कारवाई करण्यात यावी, असे शासन पत्र, दि.१६.१२.२०१७ अन्वये म्हाडा प्राधिकरणास कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्राधिकरणाने अपर पोलीस महासंचालक तथा मुख्य व सुरक्षा अधिकारी, म्हाडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील सुमारे ५६ अधिकाऱ्यांची यामध्ये चौकशीची कार्यवाही म्हाडा प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर महानगरपालिकेतील कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा प्रकल्प पुर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत

**(१३) * १०८५११ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरमध्ये कचऱ्यातून वीजनिर्मितीचा रुपये १५ कोटींचा प्रकल्प माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सुरु होणार असल्याचे शासनाने घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीजनिर्मिती प्रकल्प हा ३० वर्षाच्या करारावर रोकेम कंपनीकडे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी दरवर्षी सुमारे २ कोटी रुपये कंपनीला देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणेबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणारा "कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा प्रकल्प" मे. रोकेम सेप्रेशन सिस्टिम लि. मुंबई व महानगरपालिका यामध्ये दि. ०७/०२/२०१४ रोजी PPP मॉडेल अंतर्गत झालेल्या करारनाम्यानुसार DBFOT तत्वावर महानगरपालिका स्तरावर उभारण्यात येत आहे.

• सदर करारनाम्यात प्रकल्पाची किंमत रु.३० कोटी व त्याचा "कालावधी ३० वर्ष" इतका असेल, असे नमूद आहे, ही वस्तूस्थिती आहे.

(३) उभारण्यात येणाऱ्या वीजनिर्मिती प्रकल्पाची प्रतिदिन कचरा प्रक्रिया क्षमता १८० टन इतकी आहे. करारनाम्यानुसार कचऱ्यावर प्रक्रिया केल्यानंतर कंपनीला प्रती टन रु.३०८ या दराने प्रक्रिया शुल्क अनुज्ञेय असणार आहे.

(४) सदर प्रकल्पाचे संपूर्ण "स्थापत्य विषयक" कामे पूर्ण झाली असून प्रकल्पाशी संबंधित सर्व यंत्रसामुग्री जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रकल्प माहे एप्रिल, २०१८ अखेर कार्यान्वित करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# खारघर (नवी मुंबई) येथील उत्सव चौकात रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१४) * ११४९०३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (नवी मुंबई) येथील उत्सव चौकात रस्त्यांवरील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे श्रीमती शिल्पा पुरी या महिलेचा दुचाकीवरून पडून मृत्यु झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबधीत कंत्राटदार व सिडको प्रशासन एकमेकांना दोषी ठरवीत असून त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार संबंधित कंत्राटदार व सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याबाबत, कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्याबाबत तसेच सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.१४/१०/२०१७ रोजी सांयकाळी खारघर (नवी मुंबई) येथील उत्सव चौकाजवळ झालेल्या अपघातात दुचाकीवरुन प्रवास करणारी महिला खाली पडल्याने सदर महिलेचा मृत्यू झालेला आहे.

(२) व (३) सदर अपघातासंदर्भात सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने निरीक्षण केले असता उक्त अपघातग्रस्त महिला दुचाकी चालविताना भ्रमणध्वनी हाताळत असल्याने तीचे दुचाकीवरील नियंत्रण जावून तोल गेला व त्याच वेळी पाठीमागून येणाऱ्या हायड्रोक्रेनच्या चाकाखाली आल्याने सदर महिलेचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोल्हापूर येथे झालेल्या अपघातात १३ जण मृत्युमुखी पडल्याबाबत

**(१५) * ११२७२५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील बालेवाडी येथील केदारी कुटुंबियांच्या पन्हाळ्यावरुन कोल्हापूरकडे येत असलेली मिनी बस पंचगंगा नदीवरील शिवाजी पुलावरुन २० फूट खोल नदीत पडून झालेल्या अपघातात बसमधील १३ व्यक्तीचा बुडून मृत्यु झाल्याची घटना दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघाताबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार या अपघातात मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना व जखमींना शासनाने कोणती आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

दिनांक २६ जानेवारी, २०१८ रोजी रात्री ११.३० चे सुमारास कोल्हापूर ते रत्नागिरी रोडवर, आंबेवाडी (ता.करवीर) हददीतील पंचगंगा नदीवरील शिवाजी पुलावर मिनी बसच्या चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस पुलाच्या कठड्याला धडकून नदीपात्रात कोसळली. या दुर्घटनेत लहान बालके, महिला, पुरुष असे १२ प्रवासी व बसचालक मयत झाले असून ३ प्रवासी गंभीर जखमी आहेत.

(२) व (३) याप्रकरणी करवीर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २०/२०१८, भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ), ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत आरोपी बसचालकाची रक्ततपासणी केली असता चालकाने मद्यसेवन केल्याचे आढळून आल्याने सदर गुन्हयामध्ये भा.दं.वि.सं. कलम ३०४(२) व मोटार वाहन कायदा कलम १८५ या वाढीव कलमांचा समावेश करण्यांत आला आहे.

मृत व्यक्ती या पुणे जिल्हयातील असल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चान्नी पोलीस स्टेशन (ता.पातुर, जि.अकोला) येथे चार निरापराध लोकांना करण्यात आलेली मारहाण

**(१६) * ११५३८१ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चान्नी पोलीस स्टेशन (ता.पातुर, जि.अकोला) अंतर्गत खुनाच्या खोट्या प्रकरणात चार निरापराध लोकांना सतत चार दिवस तुरंगात अटकेत ठेवून दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास जबर मारहाण करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्दैवी मयत इसमाचा मृत्यू घातपात नसून अपघाती झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चारही निरपराध लोकांना संशयित म्हणून बेकायदेशीररीत्या अटकेत ठेऊन केलेली मारहाण पोलिसांनी राजकीय तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दबावापोटी केल्याचे अन्यायग्रस्तानी पोलीस अधीक्षक यांना सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) मृतक दिपक सखाराम गुडदे, मळसुर हा ठेकेदारीचे काम करीत होता. तो मोटार सायकलने बाभुळगांव विवरा मार्गे येत असतांना विवरा फाट्यापुढे दि.२/२/२०१८ रोजी सायंकाळी त्याच्या मोटार सायकलला अज्ञात वाहनाने

धडक दिल्याने त्याचा मृत्यू झाला. त्याबाबत पो.स्टे. चान्नी येथे अप.क्र.२७/ २०१८ कलम २७९, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४,१३२ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद झाला आहे. त्या अनुषंगाने गुन्ह्याच्या प्रथम खबरीमध्ये फिर्यादीने घातपाताचा संशय व्यक्त केला होता. गुन्ह्याच्या तपासात ६ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. घटनास्थळाच्या पंचनामामध्ये घटनास्थळाचे शेजारी सापडलेले रक्त लागलेले लाकडी बांबु तसेच लोखंडी तार जप्त करण्यात आली आहे. घटनास्थळी मिळालेल्या वस्तू व मृतकाच्या अंगावरील कपडे, घटनास्थळावरील रक्त मिश्रीत माती तपासणीकरीता न्यायसहाय्यक, वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथे पाठविण्यात आले असून अद्याप अहवाल अप्राप्त आहे. मृतकाच्या शव विच्छेदन अहवालात Head Injury असे नमूद केले आहे.

(३) हे खरे नाही.

अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल असल्याने सदर गुन्ह्याच्या तपासात कोणत्याही व्यक्तीस अटक करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे कोणासही मारहाण करण्यात आली नाही.

(४) गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेवगाव (जि.अहमदनगर) येथील श्रीराम मंदिर देवस्थानच्या भूखंडावर खाजगी विकसकांनी परमिट रुम बांधल्याबाबत

**(१७) * ११५१९६ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगांव (जि.अहमदनगर) येथील श्रीराम मंदिर देवस्थान ट्रस्टला धार्मिक कार्यासाठी व देवस्थानच्या देखभालीसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर खासगी व्यावसायिकांनी परमिट रुम बांधल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीराम मंदिर ट्रस्टला ३१ एकरांहून अधिक जमीन इनाम मिळाली असून देवस्थानच्या देखभालीसाठी या जमिनीतून उत्पन्न घेण्याच्या अधिकाराचा विश्वस्तांनी गैरवापर करुन शेवगाव नेवासा रस्त्यांवर असलेल्या ट्रस्टच्या भूखंडावर दोन्ही बाजूंना अनेक इमारती उभारण्यात येऊन परमिट रुम देखिल बांधल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे तसेच सदर प्रकरणाची विशेष चौकशी पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शेवगाव (जि.अहमदनगर) येथील श्रीराम मंदिर देवस्थानाच्या देखभालीसाठी देण्यात आलेल्या भूखंडावर खाजगी व्यावसायिकांचे परमिट रुम बांधल्याचे माहे फेब्रुवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास तक्रारीच्या माध्यमातून निदर्शनास आले आहे. जानेवारी, २०१८ मध्ये दाखल तक्रारीच्या अनुषंगाने निरीक्षक चौकशी क्र.१२/१८ मध्ये सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३७ अन्वये चौकशी चालू करण्यात आलेली आहे.

(२) अहमदनगर कार्यालयातील निरीक्षकांमार्फत चौकशी सुरु असून, चौकशी अद्याप प्रलंबित आहे.

(३) अहमदनगर कार्यालयातील निरीक्षकांमार्फत निरीक्षक चौकशी क्र.३०/१७ व १२/१८ मध्ये कलम ३७ अन्वये चौकशी चालू करण्यात आलेली आहे. चौकशी सुरु असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न सध्या उद्भवत नाही. चौकशीमध्ये विसंगत बाबी वा तथ्य आढळल्यास नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत स्वाईन फ्ल्यूची साथ मोठ्या प्रमाणात पसरल्याबाबत

**(१८) * ११५२७२ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत स्वाईन फ्ल्यूची मोठ्या प्रमाणात साथ पसरलेली असून महानगरपालिका व शासकीय रुग्णालयात तसेच खासगी रुग्णालयामध्ये मोठ्या प्रमाणात रुग्ण दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षात स्वाईन फ्ल्यूच्या लागणीमुळे एकुण ७४ रुग्णांचा मृत्यु झाला व जानेवारी, २०१८ या वर्षाच्या सुरुवातीला एका महिलेचा मृत्यु झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वाईन फ्ल्यूची साथ रोखण्यासाठी रुग्णालयात व परिसरात कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१७ मध्ये नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २६४ व कार्यक्षेत्राबाहेरील २३० इतके स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण आढळले होते.

(२) होय.

वरील रुग्णांपैकी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ३२ व कार्यक्षेत्राबाहेरील ४२ अशा एकूण ७४ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच, माहे जानेवारी २०१८ मध्ये महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील एका स्वाईन फ्ल्यू रुग्ण महिलेचा मृत्यू झालेला आहे.

(३) स्वाईन फ्ल्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना नियमितपणे करण्यात येत आहेत.

• स्थानिक वृत्तपत्र, होर्डिंग्जवर जाहिराती, रेडिओ चॅनल्स, टि.व्ही. इत्यादी माध्यमांव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

• महानगरपालिका रुग्णालयात १६ ठिकाणी स्क्रिनिंग सेंटर उभारण्यात आले आहे.

• शहरी आरोग्य केंद्रांमार्फत स्वाईन फ्ल्यू पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आलेल्या परिसरात सर्वेक्षण करण्यात येते.

• परिसरात स्वच्छता करण्यात येऊन जंतु नाशक पावडर टाकण्यात येते.

• महानगरपालिकेच्या डॉ.झाकिर हुसेन रुग्णालयात स्वतंत्र स्वाईन फ्ल्यू कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

• संशयित स्वाईन फ्ल्यू रुग्णाच्या घशाचा स्वॉब घेऊन तात्काळ राष्ट्रीय विषाणू संस्था, पुणे येथे तपासणीसाठी पाठविण्यात येतो व रुग्णावर तात्काळ उपचार करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टेंपल रोज रियल इस्टेटच्या संचालकांनी जमीन खरेदी-विक्री प्रकरणी हजारो लोकांची सुमारे ७०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१९) * ११५२०९ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंपल रोज रियल इस्टेटच्या संचालिका देवीदास सजनानी, दिपा सजनानी व वनिता सजनानी यांनी ठाणे, नवी मुंबई, पुणे, रायगड, हैद्राबाद इ. ठिकाणी जमीन खरेदी-विक्री प्रकरणी हजारो लोकांची सुमारे ७०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अभय कांतीलाल शहा तसेच शेकडो व्यक्तींनी पुणे शहर व इतरत्र पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या असून मा.उच्च न्यायालयाने आदेश दिल्या नंतर पोलीसांनी या व्यक्तींना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीमध्ये टेंपल रोज रियल इस्टेट या कंपनी व संचालकांविरोधात नोंदविलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार टेंपल रोज रियल इस्टेट व त्यांच्या संचालकांविरोधात तसेच संचालकांच्या सहकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी तक्रारदारांनी केलेल्या तक्रारीनुसार मे. टेंपल रोज रियल इस्टेट प्रा.लि. या कंपनीसह मे. टेंपल रोज लाईव्ह स्टॉक प्रा.लि., टेंपल रोज मार्केटींग प्रा.लि. व इतर कंपनीचे संचालक यांनी गुंतवणूकदारांना भुखंड खरेदी-विक्री बाबत १) इक्वीटेड मंथली इन्स्टॉलमेंट २) इन्कम ग्रोथ प्लॅन ३) गॅरेंटेड डबल ४) गॅरेंटेड बायबॅक ५) युनिट सर्टिफिकेट ६) रेव्हेन्यु शेअरींग अशा वेगवेगळ्या योजनांमधुन चांगल्या परताव्याचे, व्याजदराचे व स्वस्तदरात मासिक हप्त्याने भुखंड विक्रीचे आमिष दाखवुन सदर कंपनीमध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडले. यामधील गुंतवणुकदारांना मुदतीत परतावा, व्याज व भुखंड न दिल्याने त्यांची फसवणुक केली आहे.

(३) सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ०८/१७, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, १२०(ब) सह कलम ३, ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ व कलम ३, ४ व ५ पीसीएमसीबी कायदा, १९७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दोन गुन्हे दाखल आहेत. १) चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २७५/१७, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, १२०(ब), ३४ सह कलम ३, ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ व कलम ३, ४ व ५ पीसीएमसीबी कायदा, १९७८ अन्वये गुन्हा नोंद.

२) लष्कर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ६०/१७, भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ३४ सह कलम ३ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हा नोंद.

नमुद गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. या गुन्ह्यांतील आरोपींच्या जप्त मालमत्तेची अधिसूचना शासन स्तरावरुन दिनांक ०२.११.२०१७ रोजी निर्गमित करुन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या अधिसुचनेन्वये एकूण ३४२ स्थावर मालमत्ता व ५५ जंगम मालमत्ता संरक्षित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, या मालमत्तेची निर्गती होण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण

अधिनियम, १९९९ अंतर्गत सदर प्रकरणी नियुक्त सक्षम प्राधिकारी, उपजिल्हाधिकारी (सामान्य), मुंबई शहर यांचेमार्फत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मरोळ, अंधेरी (पूर्व) मुंबई येथील न.भू. क्र. ३०८ या जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) * ११५६७६ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मरोळ, अंधेरी (पूर्व) मुंबई येथील न.भू. क्र. ३०८ ही जमीन श्रीमती लूसी ग्रेशस व इतर सात जणांच्या नावे असून जमीन कमाल मर्यादेपेक्षा जास्त असल्याने या जमिनीतील ३१११ चौ.मी. अतिरिक्त असणारी जागा सन २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नावे नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनीबाबत सन २००८ मध्ये राज्य शासनाच्या नावे दाखल केलेली नोंद अप्पर जिल्हाधिकारी यांनी कमी करून मिळकत पत्रिकेवर मूळ धारक श्रीमती लूसी अँथोनी ग्रेशस व इतर सात जणांची नावे नियमबाह्य पद्धतीने कायम केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ मध्ये सदर जमीन दुर्बल घटक घरबांधणी योजना राबविण्याकरिता आरक्षित करण्यात येऊन राज्य शासनाच्या परवानगी शिवाय जमिनीची विक्री करता येणार नाही अशी नोंद दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमिन मालकाने उक्त जमीन शासनाची परवानगी न घेता दुसऱ्यास विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित जमीन मालक व त्यास सहाय्य करणारे संबंधित अधिकारी तसेच इतर संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

मौजे-मरोळ, अंधेरी (पूर्व) मुंबई येथील न.भू. क्र. ३०८, ३०८/१ ते ३ मधील अतिरीक्त घोषित क्षेत्र-३१११.०५ चौ.मी. च्या संपादनाबाबत दि.२१/०७/२००६ च्या अधिसुचनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद मिळकतपत्रिकेवर घेण्यात आली होती.

(२) व (३) जमिनधारक श्रीमती लूसी अँथोनी ग्रेशस यांच्या मौजा मरोळ, अंधेरी (पूर्व) मुंबई येथील न.भू. क्र. ३०८, ३०८/१ ते ३ मधील ३१११.०५ चौ.मी. इतक्या अतिरिक्त क्षेत्रावर नाजकधा कलम २० अन्वये गृहबांधणी योजना दि.१७.११.१९९९ च्या आदेशानूसार मंजूर करण्यात आली होती. परंतू सदर योजना योजनाधारकाने न राबविल्याने रद्द करण्यात आली होती. परंतु योजनाधारकाने नाजकधा अधिनियम, १९७६ चे कलम ३४ खाली शासनास सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जावर शासनाने दि.०६/११/२००७ च्या आदेशानुसार नाजकधा कलम १०(३) नुसार केलेली कार्यवाही रद्द करून, नाजकधा कलम २० नुसार गृहबांधणी योजना कायम ठेवण्याचे आदेश दिले. सदर जमिनीच्या मिळकतपत्रिकेवरील महाराष्ट्र शासनाची नोंद कमी करून कलम २० खालील सुटीच्या आदेशाबाबत “महाराष्ट्र शासनाच्या परवानगीशिवाय जमिनीच्या विक्रीस प्रतिबंध” अशी नोंद दि.०७/०६/२०११ रोजी घेण्यात आली आहे.

(४) व (५) जमिनधारक यांनी योजनेखालील क्षेत्र नोंदणीकृत कराराद्वारे दि.०८/०३/२०११ रोजी विक्री केले होते. परंतु सदरचे क्षेत्र गृहबांधणी योजनेखालील असल्याचे निदर्शनास आल्याने योजनेखालील क्षेत्र खरेदीखतामधून वगळण्यात आल्याने अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांचे स्तरावरून प्रस्तुत योजनेस दि.२०/०४/२०१८ पर्यंत दंडात्मक मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच विचाराधीन जमिनीबाबत जमिनधारक यांनी जमिनीच्या खरेदीखतामध्ये फसवणूक झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयासमोर सुट नं. (L) २१०/२०१५ दाखल करण्यात आला आहे. तसेच त्यासंबंधीत नोटीस ऑफ मोशन (L) ६५१/२०१५ मध्ये दि.१९/०३/२०१५ व

दि.१२/०६/२०१५ रोजी अंतरीम आदेश पारीत असून, खरेदी दस्त ५५७८/२०११ रद्दबातल करणे व खरेदीदाराचा जागेवर कोणताही हक्क प्रस्थापित करू नये या जमिनमालकाच्या मागणीबाबत ad-interim injunction चे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंत्रालयातील कंत्राटी शिपाई कर्मचाऱ्याने रुपये १८ लाखाच्या बनावट नोटा छापल्याबाबत

**(२१) * ११५८८९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालयातील कंत्राटी शिपाई कर्मचाऱ्याने रुपये १८ लाखाच्या बनावट नोटा छापल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई गुन्हे शाखेने शिपायाच्या घरावर छापा टाकून रुपये १८ लाख ४० हजाराच्या बनावटी नोटा जप्त केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये माहे जानेवारी २०१८ वा त्या दरम्यान मंत्रालयातील कंत्राटी शिपाई कर्मचाऱ्याने रुपये १८ लाखाच्या बनावट नोटा छापल्याबाबत गुन्हा नोंद नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विकासकांनी म्हाडाला सरप्लस जागा न देता म्हाडाची रुपये ५८ कोटी १५ लाखांची फसवणूक केल्याबाबत

**(२२) * १०५८७८ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाला सरप्लस जागा न देता म्हाडाची रुपये ५८ कोटी १५ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन महिन्यांत तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून, आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून तपास केला जात असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाचे अभियंते अभय रामटेके यांनी विकासकाविरोधात माटुंगा पोलीस ठाण्यात म्हाडाला द्यावयाची ११३३.७० चौ.मी.जागा न देता, विकासकाने ती जागा दुसऱ्यांना विकुन शेकडो कोटी रुपये फायदा घडवून, रेडिरेकनर भावाप्रमाणे म्हाडाचे रुपये २६ कोटी ८५ लाखाचे नुकसान केल्याबाबतचा गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दादर पूर्वेकडील नायगांव परिसरातील एका प्रकल्पातील १२०९.३८ चौ.मी. सरप्लस जागा म्हाडाला दिली नाही म्हणून भोईवाडा पोलीस ठाण्यात दोन विकासकांविरोधात रुपये २२ कोटी ८० लाख फसवणूक केल्याबद्दल गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दादर पश्चिम येथील एका प्रकल्पातील ४२२.९५ चौ.मी. सरप्लस जागा म्हाडाला दिली म्हणून म्हाडाची रुपये ८ कोटी ५० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी एका विकासकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या विविध प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या विकासकांची नावे काय आहेत व त्यांच्यावर कोणकोणते गुन्हे दाखल झालेले आहेत व तद्नुसार विकासकांविरुध्द अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ६३/१७, (माटुंगा पोलीस स्टेशन गु.र.क्र. २५३/१७) भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ प्रमाणे आरोपी मे. भावी होम्स प्रा. लि. चे संचालक धीरज एल. शहा व इतर विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ५६/१७, (भोईवाडा पोलीस स्टेशन गु.र.क्र. १७५/१७) भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ प्रमाणे आरोपी मे. आर्टस मॉड्यूल इंटरनॅशनल प्रा. लि. व मे. अरिहंत बिल्डर्स विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ५७/१७, (दादर पोलीस स्टेशन गु.र.क्र. १९१/१७) भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२० प्रमाणे आरोपी दिवाकर विश्वनाथ सुर्वे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) सदर प्रकरणी विकासकांनी प्रकल्प पुनर्विकासाकरीता घेऊन, या प्रकल्पातील अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ म्हाडा प्राधिकरणाला हस्तांतरीत करणे बंधनकारक असताना देखील हस्तांतरीत न केल्याने झालेल्या फसवणुकीबाबत म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे वरीलप्रमाणे ३ गुन्हे दाखल करण्यात आले असुन नमूद ३ गुन्हे तपासाधीन आहेत.

या सर्व विकासकांची स्थावर व जंगम मालमत्तांबाबतची माहिती संकलित करण्यात येत असुन, तदनंतर विकासकांची मालमत्ता जप्त करुन, लिलावात काढण्याचे प्रस्तावित आहे. त्यामधुन प्राप्त होणाऱ्या रक्कमेतुन म्हाडास देय असलेल्या अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळाची वसुली करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील औषध खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(२३) * ११५०७० प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने कॅगच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करुन खोटी माहिती दिल्याने औषध खरेदी प्रकरणात रुपये ९ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सन २०१३ ते २०१५ या २ वर्षात खरेदी केलेल्या ९ कोटी रुपयांच्या औषध खरेदी नंतर त्याबाबतची तपासणी व साठा आरोग्य विभागाच्या अंतर्गत लेखा परीक्षकांनी तपासला असल्याचा खोटा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, प्रधान महालेखापाल कार्यालयाने पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाबाबत जून २०१६ मध्ये लेखापरिक्षण केलेले असून पुणे महानगरपालिकेच्या मेडिकल स्टोअर्स मधील सुमारे रू.९ कोटी किंमतीच्या सर्जिकल व नॉन सर्जिकल वस्तूंच्या नोंदी व फिजिकल व्हेरिफिकेशन करण्यात आलेले नाही असा आक्षेप लेखापरिक्षकांनी काढलेला आहे.

(२) सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या दोन आर्थिक वर्षाच्या कालावधीत रूपये ९ कोटी एवढी सर्जिकल व नॉन सर्जिकल वस्तुंची खरेदी पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर आक्षेपामध्ये तथ्य नसल्याचे पुणे महानगरपालिकेचे म्हणणे आहे.

अशा प्रकरणी पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत लेखापरिक्षकांकडून नियमित तपासणी करण्यात येते.

पुणे महानगरपालिकेमार्फत महालेखापालांच्या आक्षेपाबाबतचे स्पष्टीकरण सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) पुणे महानगरपालिकेच्या मेडिकल स्टोअर्समधील सर्जिकल व नॉन सर्जिकल वस्तु तसेच औषधांच्या साठ्याबाबत वेळोवेळी फिजिकल

व्हेरिफिकेशन करण्याचे तसेच खरेदी केलेल्या औषधांचा वेळीच विनियोग करण्याबाबत व ती मुदतबाह्य होणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मोनोरेलच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी एमएमआरडीएने तीनवेळा निविदा काढूनही अद्याप एकही कंत्राटदार मिळाला नसल्याबाबत

**(२४) * ११३१२३ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मोनोरेलच्या देखभालीसाठी आणि सुरक्षेसाठी एमएमआरडीएने तीनवेळा निविदा काढल्यानंतरही अद्याप एकही कंत्राटदार मिळाला नसल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हैसूर कॉलनी स्टेशनजवळ मोनोरेलच्या दोन डब्यांना दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी आग लागली होती त्यानंतर अद्याप मोनोरेल सुरु झालेली नाही व आगीचे कारणही स्पष्ट झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोनोरेलच्या देखभाल व सुरक्षेसाठी नवीन कंत्राटदार शोधणे, मोनेरेल सुरु करणे तसेच मोनोरेलच्या आगीचे कारण स्पष्ट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मोनोरेल परिचलन व देखभालीसाठी मागविलेल्या निविदेच्या अनुषंगाने एकच निविदा प्राप्त झाल्याने प्राधिकरणाने सदर निविदा रद्द करुन दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अखेर निविदा मागविल्या होत्या तथापि, या निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्याने सदर निविदा प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी पहाटे ५ च्या सुमारास म्हैसूर कॉलनी स्थानकामध्ये सदर रिक्त मोनोरेलला (गाडी क्र.८) आग लागल्याची घटना घडली हे खरे आहे.

या अनुषंगाने निवृत रेल्वे सुरक्षा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दोन सदस्यीय एक स्वंतत्र चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने त्यांचा अहवाल सादर केला आहे. चौकशी समितीने केलेल्या शिफारशीनुसार योग्य ती कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे.

म्हैसूर कॉलनी मोनोरेल स्थानकामध्ये आगीमुळे बांधकामाची, विद्युत केबल्स आणि विद्युत उपकरणांची झालेली हानी यांचे दुरुस्तीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

-----------------

## नांदेड येथील अनेक गुंतवणूकदारांची बीट कॉईन या आभासी चलनाच्या कंपनीने केलेली फसवणूक

**(२५) * ११५०१० डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील अनेक गुंतवणूकदारांची बीट कॉईन या आभासी चलनाच्या व्यवहारात गेन बीट कॉईन या कंपनीने रुपये १०० कोटींची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी नांदेड पोलिसांकडे चार जणांनी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलिसांनी दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास एका आरोपीला अटक केली असून या प्रकरणातील मुख्य आरोपी तसेच अनेक एजंट अद्यापही फसवणुकीचा व्यवसाय करीत असून त्यांना अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी श्री. प्रशांत पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विमानतळ पोलीस स्टेशन, नांदेड येथे ४ आरोपींविरुध्द गु.र.नं.२०/२०१८ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, २०१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(D) अन्वये दि.२४/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सदर गुन्ह्यातील १ आरोपीस दि.२४/०१/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच, गुन्ह्यातील मुख्य आरोपी व इतर २ आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.
(४) होय, सदर गुन्ह्यात २१ गुंतवणूकदारांची सुमारे ८०,२१,८५१/- रुपयांची फसवणूक झाल्याचे आजपावेतो तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी १ आरोपीस दि.२४/०१/२०१८ रोजी अटक करुन दि.२६/०१/२०१८ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. अटक आरोपी हा जामिनावर असून उर्वरित आरोपी अटक करणे व गुन्ह्यात अधिक पुरावा हस्तगत करण्यावर तपास चालू आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## सिडको प्राधिकरणाच्या अखत्यारितीतील जमिन वाटपाबाबत नेमलेल्या समित्यांच्या अहवालाबाबत

**(२६) * ११५५६४ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको प्राधिकरणाच्या अखत्यारितीतील १२.५० टक्के योजनेंतर्गत झालेली शेतकऱ्यांची फसवणूक तसेच जमिन वाटपाबाबत झालेली अनियमितता व यासारख्या अन्य बाबींकरिता शासनाने डी.के. शंकर चौकशी समिती, विनय मोहन लाल चौकशी समिती व डी.एल.एन.मुर्ती चौकशी समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित चौकशी समित्यांनी चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, समिती निहाय सदरहू चौकशी अहवालांचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, सदर चौकशी समित्यांनी चौकशी अहवाल शासनास सादर केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) विषयाधीन प्रकरणी चौकशी करण्यासाठी ३ समित्या नेमलेल्या नव्हत्या. मात्र तथापि, सिडकोचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.व्हि.एम.लाल यांच्या दि.६/५/२००३ ते दि.२८/१२/२००४ या कार्यकाळात झालेल्या भूखंड वाटपाची चौकशी करण्यासाठी डॉ.डी.के. शंकरन, तत्कालीन अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांची एकसदस्यीय समिती शासनाने गठीत केली होती. सदर समितीस चौकशी दरम्यान सहाय्यभूत ठरणारी माहिती पुरविण्याकामी श्री.डी.एल.एन. मुर्ती, पणन अधिकारी यांना सिडकोमार्फत सूचित करण्यात आले होते.

(२) व (३) डॉ.शंकरन समितीने दि.३१/३/२००५ रोजी शासनास अहवाल सादर केला होता. सदर समितीकडे चौकशीसाठी सूपूर्द केलेल्या एकूण ८३ प्रकरणांपैकी ५० प्रकरणांमध्ये अनियमितता आढळली, ११ संशयास्पद प्रकरणे आहेत व २२ प्रकरणांमध्ये अनियमीतता आढळून आलेली नाही. सदर प्रकरणी समितीने पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत :-

१. अनियमितता झालेल्या सर्व प्रकरणी नियमानुसार भूखंड वाटप रद्द करण्याचे तसेच संबंधितांकडून सिडकोस झालेले नुकसान वसूल करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

२. भूखंड वाटप प्रकरणी अनियमीतता झाल्यामुळे रु.३४७ कोटींचे नुकसान झाले.

३. अनियमीतता आणि नुकसानीस जाबाबदार असलेल्या सिडको प्रशासनातील अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करावी.

सदरहू अहवाल दि.१५/४/२००५ रोजी सिडकोस पाठविण्यात आला असता, समितीच्या अहवालात नमूद अनियमितता झालेल्या ५० प्रकरणांपैकी सिडकोने ७ प्रकरणी भूखंडवाटप रद्द केले असून ३५ प्रकरणांतील भूखंड कायम करण्यात आले आहेत. याशिवाय ४ प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून उर्वरित ४ प्रकरणी सिडकोमार्फत कार्यवाही सुरु आहे.

तसेच ११ संशयास्पद प्रकरणांपैकी ९ प्रकरणी भूखंडवाटप कायम करण्यात आले, याशिवाय १ प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून उर्वरित १ प्रकरणी सिडकोमार्फत कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी, अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या सिडको महामंडळातील संबंधित अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, झालेल्या नुकसानीचीही वसूली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टेंभूर्णी (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील एका मुलीचे अपहरण करुन तिची हत्या केल्याबाबत

**(२७) * ११५८०३ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभूर्णी (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील कोमल अनंत पवार या किशोरवयीन मुलीचे काही समाजकंटकांनी अपहरण केल्यानंतर तिच्यावर अत्याचार करुन तिची हत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या गुन्ह्याचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपींना कठोर शिक्षा करावी असे लेखी निवेदन अखिल महाराष्ट्र वडार समाज या संघटनेने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास तहसिलदार यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनाची दखल घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर गुन्ह्यात फिर्यादीचे तक्रारीवरून दिनांक ३०/१२/२०१७ रोजी पिडीत मुलगी मृत अवस्थेत मिळून आल्याने गुन्हा दाखल आहे.

(२) दिनांक ५/१/२०१८ रोजी वडार समाज संघर्ष समिती अहमदपूर यांनी तहसिलदार यांना आक्रोष मोर्चा निघणार असल्याबाबत निवेदन दिलेले आहे.

तसेच, शासनाकडे दिनांक २०/२/२०१८ रोजी वडार संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांचेकडून नमूद घटनेची चौकशी करण्यासाठी जलदगती न्यायालयाची नियुक्ती करावी अशा आशयाचे वा इतर मागण्याचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) सदर गुन्ह्याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २९/१२/२०१७ रोजी अहमदपूर पो स्टेशन येथे गु र नं ४३१/२०१७ अन्वये ३०२,३६३,३४ भादवि सह कलम ३(अ),४ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने निवासी भूखंड विक्रीचा निर्णय घेतल्याबाबत

**(२८) * ११५४३९ श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सेक्टर १ ते २८ मधील ३८ निवासी भूखंड विक्री करण्याचा निर्णय जाहिरात प्रसिद्ध करून घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,प्राधिकरणाने सन १९७२ ते १९८४ या कालवधीत स्थानिक शेतकऱ्याकडून संपादित केलेल्या जमिनीचा साडेबारा टक्के मोबदला देणे अद्याप बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाधित शेतकरी यांना साडेबारा टक्के जमीन परतावा देण्याबाबत प्राधिकरणाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातील एकुण ३८ भूखंड ९९ वर्षाने भाडेपट्ट्याने वाटप करणेकामी ई-निविदा जाहिरातीव्दारे मागविण्यात आल्या आहेत हे खरे आहे.
(२) व (३) सन १९८३ पूर्वीच्या संपादित व निर्वेध ताबा मिळालेल्या जमिनींच्या मोबदल्यात जमिन मालकांना १२.५ टक्के परतावा देण्याचे धोरण लागू नाही. त्यामुळे अशा प्रकरणात १२.५ टक्के परतावा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, याबाबत पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याबाबत तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील शहागड-पाथरवाला रस्त्यावर एका तरुणास जिवंत जाळण्यात आल्याची घटना

**(२९) * १०५५०९ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हयातील शहागड-पाथरवाला रस्त्यावर शासकीय सेवेसाठीच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करणारा उमेदवार अनंत श्रीकांत इंगोले यास हातपाय बांधून जिवंत जाळण्यात आल्याची गंभीर बाब दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित तरुणाची हत्या आर्थिक व्यवहारातून झाल्याचे त्यांच्या नातेवाईकांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार या प्रकरणातील आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी मयताचे चुलते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, गोंदी येथे गु.र.नं. ०८/२०१८ भा.दं.वि. कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे दि.०८/०१/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर गुन्हयाच्या तपासात मयताचे घटनास्थळावरुन दोन मोबाईल, आधारकार्ड, पॅनकार्ड, अंगावरील कपडे जप्त करण्यात आले आहेत. मयताच्या मोबाईल फोनचे CDR/SDR तसेच, डम डाटा हस्तगत करुन आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. तसेच, मयताचे बॅक खाते, ट्रकच्या व्यवहारासंबंधिचे पुरावे, आरोपीने गुन्हयात वापरलेले वाहन, मयताचा व्हीसेरा तपासणी अहवाल इत्यादीचा बारकाईने तपास करण्यात येत असुन गुन्हा उघडकीस आणणेकामी कसोशीने तपास चालु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील मोठागाव माणकोली खाडी पुलाच्या प्रलंबित असलेल्या कामाबाबत

**(३०) * ११५३८९ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील नागरीकांच्या वाहतूकीवर पडणारा ताण कमी करण्यासाठी शासनाने मोठागाव-माणकोली खाडीवरील पूलाच्या कामास मंजूरी देऊन मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सदरहू कामाचे भूमिपूजन झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माणकोली भिवंडी हद्दीतील कामास अजूनही सुरूवात झालेली नाही यामुळे पूलाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात ठाणेचे लोकसभा सदस्य डॉ.श्रीकांत शिंदे यांनी एका पत्राद्वारे एमएमआरडीए आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये मागील २ वर्षापासून सदरहू पूलाच्या प्रलंबित असलेल्या कामाबाबत मा.पालकमंत्री यांनी एमएमआरडीए, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच महानगरपालिका प्रशासनाच्या प्रलंबित असलेल्या पुलाचे काम शीघ्र गतीने हाती घेण्याच्या दृष्टीने कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू मोठागाव माणकोली पुलाचे काम शीघ्र गतीने हाती घेऊन लवकारात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय.
(५) व (६) मोठागांव (डोंबिवली) येथील जागेचे भूसंपादनाचे काम कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत. सदर महानगरपालिकेने भूसंपादन करुन दिलेल्या जागेमध्ये व खाडीवरील पुलाच्या कामास सुरुवात करण्यात आलेली आहे. मानकोली (भिवंडी) बाजुकडील भूसंपादनासाठी प्रकल्पबाधित जमिनीचा दर ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने जमिनीचा दर निश्चित केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भूसंपादनासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

-----------------

## दादर (मुंबई) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेतील अनियमिततेबाबत

**(३१) * १०९६४८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (पूर्व) (मुंबई) येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेच्या प्रमुख कार्यवाहकांनी ५ वर्षाहून अधिक काळ लेखा परिक्षण अहवाल सादर न करता विश्वस्त मंडळाच्या सर्व माहितीची पुर्तता न करता तसेच धर्मादाय आयुक्तांची मान्यता न घेता विश्वस्तांची बेकायदेशीर निवड केल्याप्रकरणी संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ (३) अन्वये उल्लंघन केल्याप्रकरणी संस्थेची नोंदणी रद्द करण्यासाठी ॲडव्हॉक समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी आजीव सदस्य, ज्येष्ठ पत्रकार व प्रमुख निमंत्रक सुधीर हेगिष्टे यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मा.मुख्यमंत्री आणि धर्मादाय आयुक्त यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्थेच्या कार्यवाहकांनी धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता गत ४५ वर्षे पासून परस्पर बेकायदेशीररीत्या दरमहा ८-१६ हजार रुपये इतक्या कमी दराने ‘सिनेएक्झीबिटर्सचे श्री.गांधी यांचे बरोबर बेकायदा करारादवारे भाडे रक्कम घेऊन, संस्थेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालीन प्रमुख कार्यवाहक आणि अन्य दोषींविरुध्द शासनाने त्वरीत कारवाई करुन संस्थेच्या गैरप्रकार व गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी अॅडव्हॉक समिती नियुक्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने नेमलेल्या चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संस्थेची नोंदणी रद्द करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.सुधीर रामचंद्र हेगिष्टे तक्रारदार यांनी दि.०५.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये तक्रार दाखल केली आहे.

(२) प्रमुख कार्यवाह यांनी दिलेल्या जबाबानुसार सन १९६७ साली या जागेवर सिनेमागृह व तीन मजली इमारत बांधून घेण्याचे ठरले. मेसर्स के. गांधी अॅन्ड कं. (कॉन्ट्रॅक्टर्स) यांनी स्वखर्चाने संस्थेस इमारत बांधून दिली. जुन्या नव्या इमारतीचा खर्च भरुन काढण्यासाठी सिनेमागृह व जागेच्या वापराचे उत्पन्न घ्यावे असे ठरले. तत्कालीन विश्वस्तांनी न्यायालयात याचिका दाखल करुन दाद मागितली. या कायदेशीर लढाईत होणारा विलंब लक्षात घेता विश्वस्तांनी न्यायालयात करार करुन दि.२०.१२.१९९१ साली कन्सेंट टर्म्सच्या अनुषंगाने समझोता केला. त्या समझोत्यादवारे रु.६००० ते रु.१६००० एवढी रक्कम जागा वापरापोटी मिळत होती. दि.०१.१२.२०१७ रोजी ही संपूर्ण इमारत व सिनेमागृह कन्सेंट टर्म्सच्या अटी शर्ती नुसार विद्यमान कार्यकारणीने ताब्यात घेतलेली आहे व त्यानुसार काही लक्ष रुपयांचे उत्पन्न संस्थेस प्राप्त होणार आहे असे श्री.विश्वास मोकाशी, प्रमुख कार्यवाह यांनी दिलेल्या जबाबावरुन दिसून येत आहे. सदर प्रकरणाची चौकशी सुरु असून चौकशी पूर्ण होताच अभिप्रायासह अंतिम अहवाल सादर करण्यात येईल.

(३) सद्य:स्थितीत प्रश्न उद्भवत नाही. अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) अंतिम अहवाल प्राप्त झाल्यावरच याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा लागेल.
(५) चौकशी चालू आहे.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील लेडी रतन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारती मोडकळीस आल्याबाबत

**(३२) * १०४९८७ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दैनिक शिवनेर मार्ग, गांधी नगर, वरळी, मुंबई येथील लेडी रतन एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थेंतर्गत झोपडपट्टी पुनर्विकास योजनेनुसार सन १९९९ ते २००३ या कालावधीत बांधण्यात आलेल्या १६ इमारती सद्यस्थितीत देखभाल-दुरुस्ती अभावी मोडकळीस आल्या असल्याने तसेच अनेक इमारतींना तडे गेले असून, घरातील छपर कोसळत असल्याने या १६ इमारतींचा विशेष बाब म्हणून वाढीव क्षेत्रफळ देवून पुनर्विकास करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय आणि गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने या १६ इमारतींचा तातडीने पुनर्विकास करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणता सकारात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

लेडी रतन हौसिंग कॉम्प्लेक्स सह.गृह. संस्थेच्या संदर्भात मा.लोकप्रतिनिधींचे निवेदन पुढील कार्यवाहीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दि.१६.२.२०१८ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त मा.लोकप्रतिनिधींचे निवेदनाच्या अनुषंगाने प्राधिकरणाने या योजनेविषयीची वस्तुस्थिती मा.लोकप्रतिनिधी यांना दि.२६ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये कळविली आहे.
(२) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ विनियम ३३(१०) अंतर्गत पूर्ण झालेल्या पुनर्वसन इमारतींचा पुन्हा पुनर्विकास अनुज्ञेय नाही. तथापि, इतर अनुज्ञेय विनियमाखाली संबंधित संस्था नियमोचित प्रकारे संबंधित प्राधिकरणाकडे पुनर्विकासाचा प्रस्ताव दाखल करु शकते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे.एम.एन.डी ट्रेडर्स कॉर्पोरेशन या कंपनीच्या मालकाविरोधात शासनाचा कर चुकविल्याप्रकरणी गुन्हा नोंदविल्याबाबत

**(३३) * १०८२३० श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.एम.एन.डी ट्रेडर्स कॉर्पोरेशन या कंपनीच्या मालकाविरोधात आझाद मैदान पोलीस ठाण्यात शासनाचा सव्वासात कोटी रुपयांचा कर चुकविला म्हणून महाराष्ट्र मूल्यवर्धीत कर कायदा सन २००२, कलम ७६ (झेड) अन्वये गुन्हा नोंदविल्याची बाब दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फोर्ट येथील डी.एन.रोडवरील मे.एम.एन.डी ट्रेडर्स कॉर्पोरेशन यांनी आपल्या वार्षिक अहवालात फेरफार करुन दिनांक १ जानेवारी ते ३१ मार्च, २००९ या कालावधीत रुपये ७ कोटी २६ लाखांचा शासनाचा कर थकविल्याचे चौकशीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २००९ पासून आतापर्यंत गत आठ वर्षे या थकविलेल्या कराबाबत संबधितांविरोधात शासकीय नियमानुसार किती व्याज व दंड आकारण्यात येणार आहे,
(४) असल्यास, सदर कंपनीने दंडाची तसेच कराची रक्कम शासनाकडे जमा केली नसल्यास त्यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १२/२०१८ भा.दं.वि. कलम ४२० सह ७४(२) महाराष्ट्र कर कायदा २००२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हा तपासावर आहे.

(३) सदर व्यापाऱ्यास सहायक विक्रीकर आयुक्त, (ड-०४०) अन्वेषण यांनी दि. ३० व ३१ डिसेंबर, २०१६ रोजी निर्धारणा आदेश पारित करुन कर, व्याज, व शास्ती असा एकूण रु. ७,२६,०९,५७८/- मागणी पत्र काढण्यात आले आहे.

(४) सदर कंपनीने दंडाची तसेच कराची रक्कम शासनाकडे जमा केली नसल्याने त्यांचेविरुध्द पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली.

अ) सहायक विक्रीकर आयुक्त (ड-०४०) अन्वेषण यांनी दि. ३० व ३१ डिसेंबर, २०१६ रोजी निर्धारणा आदेश पारित केले व दि. ०४.०१.२०१७ रोजी निर्धारणा आदेश व मागणी पत्र व्यापाऱ्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी चिकटवुन बजावले.

ब) सहायक विक्रीकर आयुक्त (ड-०४०) अन्वेषण यांनी दि. ०६.०३.२०१७ रोजी व्यापा-याचे एचडीएफसी बँकेचे खाते गोठविले.

क) सहायक विक्रीकर आयुक्त (ड-०४०) अन्वेषण यांनी सहआयुक्त आयकर व सहआयुक्त सेवाकर यांना व्यापा-याच्या त्यांच्याकडील पत्ता व इतर माहितीसाठी पत्र काढले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या तत्कालीन लेखाधिकाऱ्यांनी सेवेतून निवृत्त होताना कंत्राटदारांना ३२ कोटी रुपयांचे देयके वाटप केल्याबाबत

**(३४) * ११३३४७ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या तत्कालीन लेखाधिकाऱ्यांनी सेवेतून निवृत्त होताना कंत्राटदारांना ३२ कोटी रुपयांची देयके वाटप केल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.आयुक्तांनी तीन अधिकाऱ्यांची चौकशी समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशी समितीने आपला अहवाल दिला आहे काय, या अहवालानुसार शासनाने सदरहू अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१), (२), व (३) • औरंगाबाद महानगरपालिकेतील लेखाधिकारी श्री.दुर्राणी यांच्याकडे दिनांक २३.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ या कालावधीत मुख्य लेखाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.

• या अतिरिक्त कार्यभाराच्या कालावधीत श्री.दुर्राणी यांनी रु.२६.४७ कोटी रकमेची देयके कंत्राटदारास अदा केल्याचे निदर्शनास आले आहे.

• या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीकरण्याकरिता अतिरिक्त आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती महानगरपालिकेच्या दिनांक १६.१.२०१८ च्या आदेशान्वये गठीत करण्यात आलेली आहे.

• सदर समितीचा अहवाल प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील ज्योर्तिलिंग मंदिर तिर्थक्षेत्राला 'अ' दर्जा देण्याबाबत

**(३५) * ११०६२३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील १२ ज्योर्तिलिंगापैकी औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील ज्योर्तिलिंग मंदिर असून राज्यासह परराज्यातून लाखो भाविक या तिर्थक्षेत्राला भेट देत असल्याने पर्यटकांना चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी औंढा नागनाथ क्षेत्राला 'अ' दर्जा देण्यात यावा अशी तेथील लोकप्रतिनिधीनी व भाविकांनी मागील २ वर्षापासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, पर्यटनमंत्री, सचिव, पर्यटन विभाग आदींकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औंढा नागनाथ तिर्थक्षेत्राला 'ब' वर्ग दर्जा दिल्यामुळे शासनाकडून तिर्थविकासासाठी फारसा निधी वितरीत केला जात नसल्याने भाविकांना निवास स्थान, भोजन, वाहनतळ व अन्य सोयी-सुविधा अपुऱ्या पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार औंढा नागनाथ या तिर्थक्षेत्राला 'अ' वर्ग पर्यटन दर्जा देवून विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) औंढा नागनाथ क्षेत्राला "अ" दर्जा देण्याबाबत निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि, सदर तिर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून नियोजन विभागाच्या दि.०४.०६.२०१५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आगामी वर्षात किती अतिरिक्त नियत व्यय उपलब्ध होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. त्यांच्या अभिप्रायानंतर मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्या चाळींच्या पुनर्विकास योजनेंतर्गत विकासकांनी आणि म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(३६) * ११५३३३ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग**

**बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या चाळींच्या पुनर्विकास योजनेंतर्गत मागील ७ वर्षात विकसीत करण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये विकासकांनी आणि म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे १ लाख ५५ हजार चौरस मीटरचा विकास करून परस्पर सुमारे २० हजार कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार श्री.कमलाकर शेणॉय यांनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री,लाचलुचपत विभाग (एसबी) आदिंकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील जुन्या मोडकळीस आलेल्या चाळींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने डीसीआर ३३(७ )अन्वये म्हाडाला अधिकार दिले आहेत तर म्हाडाने विकासाचा अधिकार विकासकाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाळींच्या पुनर्विकास केल्यानंतर जेवढा विकास करण्यात आला त्याच्या ५० टक्के भाग विकासक आणि ५० टक्के भाग म्हाडाचा असताना विकासकांनी म्हाडाचा भाग परस्पर विकून सुमारे २० हजार कोटींचे शासनाचे नुकसान केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.कमलाकर शेणॉय यांनी मा.उच्च न्यायालयात, महाराष्ट्र शासन व इतर यांच्याविरुध्द Criminal Public Interest Litigation No.२८ of २०१८ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर

करण्यात आले आहे. सदर प्रकरणाची दि.०८.०२.२०१८ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान मा.न्यायालयाने याचिकाकर्ता श्री. कमलाकर शेणॉय यांना याबाबत लाचलुचपत विभागाकडे सविस्तर जबाब नोंदविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अधिसुचना दि.२५.०१.१९९९ व दि.२१.०५.२०११ मधील तरतुदीनुसार उपकरप्राप्त इमारतींचे मालक/ विकासक व ७०% भाडेकरु/रहिवाश्यांच्या संमतीने पुनर्विकास योजना राबविण्यात येतात. मुंबई शहरातील उपकर प्राप्त इमारती या खाजगी मालकीच्या असून, मंडळातर्फे पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मधील तरतुदीनुसार खाजगी मालक किंवा मालकांनी नेमलेल्या विकासकास ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. तद्नंतर उपकर प्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्याची जबाबदारी ही ना-हरकत प्रमाणपत्रधारकांवर असते.

(३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत ज्या उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासांकरिता विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले जाते. ज्या योजनांमध्ये विक्रीयुक्त बांधकाम क्षेत्रफळ हे ५०% पेक्षा जास्त येत असेल तर त्या योजनांमध्ये म्हाड अधिनियम परिशिष्ट-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व मंडळाने परिगणित केल्यानुसार विकासकाने अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ हे पुनर्विकासाचे काम पूर्ण केल्यानंतर मंडळास सुपूर्द करणे बंधनकारक असते.

सन २०११ मध्ये मंडळातर्फे ज्या विकासकांनी म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाही, नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये त्याबाबत तरतूद केली नाही किंवा त्रयस्थ व्यक्तींना विकले आहेत, अशा २९ विकासकांविरुध्द आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामध्ये सविस्तर गुन्हे नोंदविले आहे. शासन गृहनिर्माण विभागाने दि.१५.१०.२०१२ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या निर्देशानुसार ०९ प्रकरणांमध्ये विकासकांकडून अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ ६४८३.५४ चौ.मी. म्हाडाने ताब्यात घेतले असून, ३५.८५ चौ.मी. ऐवजी शीघ्र गणकाच्या दरानुसार रक्कम रुपये १.०८ कोटी वसुल केले आहेत. याव्यतिरीक्त या ०९ प्रकरणांमध्ये विकासकांकडून

दंडात्मक रक्कम रुपये ९.०६ कोटी वसुल करण्यात आले आहे. उर्वरित प्रकरणांमध्ये विकासकांनी दंडात्मक रक्कम मंडळाकडे भरणा केलेली नाही. तसेच या प्रकरणामध्ये एकूण ७३९२.८८ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंडळास सुपूर्द केलेले नाही. अशा विकासकांविरुध्द आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने संबंधित न्यायालयात चार्जशिट दाखल केल्या आहेत व पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तद्नंतर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सन २०१७ मध्ये पुन्हा ०५ विकासकांविरुध्द गुन्हे नोंदविले आहेत.

म्हाडास देय असलेले दंडात्मक रक्कम व उर्वरित अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ वसुल करण्याच्या दृष्टीने मंडळातर्फे विकासकाची स्थावर व जंगम मालमत्ताबाबतची माहिती मिळविण्यासाठी सह उपनिबंधक-मुंबई शहर, जिल्हाधिकारी-ठाणे, शहर आणि उपनगरे व विकासकांच्या बँक खात्याबाबतची माहिती रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलित झाल्यानंतर, मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे महसुल पुर्नप्राप्ती साठी (Revenue Recovery Certificate) देण्यात येईल. तद्नंतर विकासकांची मालमत्ता जप्त केल्यानंतर, लिलावात काढण्याचे प्रस्तावित असून त्यामधुन प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून मंडळास देय असलेल्या अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळाची वसुली करण्यात येईल.

(४) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करुन, ज्या विकासकांनी म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाही, तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये तरतूद केली नाही व त्रयस्थ व्यक्तींना विकले आहेत, याबाबतची खात्री केल्यानंतर अशा एकूण २९ प्रकरणांमध्ये सन २०११ मध्ये व सन २०१७ मध्ये ०५ प्रकरणांमध्ये असे एकूण ३४ प्रकरणांमध्ये विकासकांविरुध्द गुन्हे अन्वेषण विभागाकडे सविस्तर गुन्हे नोंदविण्यात आले आहे. सदर प्रकरणांमध्ये गुन्हे अन्वेषण विभागाने सविस्तर तपास करुन ज्या विकासकांनी अद्याप म्हाडास देय असलेले अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द केले नाहीत, त्यांच्याविरुध्द संबंधित न्यायालयात चार्जशिट दाखल करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेरळ (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील वडाप व्यावसायिकाची हत्या झाल्याबाबत

**(३७) * ११५५८१ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेरळ (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील वडाप व्यावसायिक श्री. राजाराम चव्हाण यांची भर रस्त्यात तिघांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास हत्या केल्या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तपास संशयास्पदरीतीने झाल्याचे व पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे खून चोरीच्या उद्देशाने न होता हा जमिनीच्या वादातून झाल्याचे व मारेकरी बाहेरचे असल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मृत व्यक्तीच्या पत्नी श्रीमती दिपेश्री चव्हाण यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्याचे गृहमंत्री यांच्याकडे या गुन्ह्याचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत (सीआयडी) व्हावा अशी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदरहू तपास सीआयडी मार्फत होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१),(२), (३) व (४) सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपींनी मयताचे गळ्यातील सोन्याची चैन चोरी करण्याचे उद्देशाने खून केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरचा खून जमिनीचे वादातून झाल्याचे तसेच आरोपी यांचे अन्य कोणी बाहेरचे साथीदार असल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही. सदर प्रकरणी ३ आरोपींविरूद्ध मंडणगड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४७/२०१७ भा.दं.वि.क. ३०२, ३९७, २०१, १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करून तीनही आरोपींना अटक करून आरोपीविरूद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील एमएमआरडीएमार्फत सुरु असलेल्या फोरेस्ट नाका ते होप इंडिया या रस्त्याचे कॉँक्रीटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३८) * १०६२७७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील एमएमआरडीएमार्फत सुरु असलेल्या फोरेस्ट नाका ते होप इंडिया या रस्त्याचे कॉँक्रीटीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व संथगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार सदर रस्त्याचे कॉँक्रीटकरण दर्जेदार होणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली तसेच या रस्त्याचे काम पाहणारे अभियंता व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन रस्त्याचे जानेवारी, २०१८ पर्यंत ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे. सदर रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी प्राधिकरणाच्या दक्षता विभागास आदेशित करण्यात आले आहे. दक्षता पथकाने कामास दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी भेट दिली असून, कामाचे नमूने तपासणीसाठी गोळा केले आहेत. हे नमुने चाचणीस्तव पाठविण्यात आले आहेत.

-----------------

## नवी मुंबईतील सेझसाठी आरक्षित असणारी १७०० हेक्टर जमीन औद्योगिक वसाहतीसाठी वापरण्यात येणार असल्याबाबत

**(३९) * १०५६७९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सेझसाठी आरक्षित असणारी १७०० हेक्टर जमीन औद्योगिक वसाहतीसाठी वापरण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीचा १५ टक्के भाग वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवासाकरिता वापरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सेझसाठी आरक्षित असणारी जमीन औद्योगिक वसाहतीसाठी वापरण्याची नेमकी काय कारणे आहेत,
(४) असल्यास, औद्योगिक वसाहतीसाठी जमिनीचा लवकरात लवकर वापर व्हावा यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे तसेच १५ टक्के राखीव जमिनीमधून वसाहतीमधील कर्मचाऱ्यांसाठी व सामान्य नागरिकांसाठी किती हजार घरे उपलब्ध होणार आहेत,
(५) असल्यास, सदर घरे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी १८४२ हे. जमीन नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (NMSEZ) कंपनीला विकसीत करण्यासाठी भाडेपट्याने देण्यात आलेली आहे.

याबाबत सिडको महामंडळाने सादर केलेल्या प्रस्तावानुषंगाने दि.३०/१/२०१८ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार शासनाने नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी अधिसूचीत केलेल्या क्षेत्राचा विकास एकात्मिक औद्योगिक क्षेत्र म्हणून करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. तसेच, सदर क्षेत्राच्या जमिनीच्या अनुज्ञेय वापरामध्ये बदल न करता, एकूण क्षेत्राच्या ८५% औद्योगिक व कमाल १५% रहिवास वापर अनुज्ञेय करण्यात आला आहे.

सिडकोचे प्रचलित धोरण, कंपनीसोबतचे करारनामे, प्रस्तावित उद्योग विकास या सर्व बाबी तपासून व त्याबाबत निर्णय घेऊन, सदर निर्णय सिडको महामंडळाला कळविण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## मौजे शिरढोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अनधिकृत कंटेनर यार्ड बांधल्याबाबत

**(४०) * ११४९०५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरढोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सर्व्हे क्र. २६० मधील २५ ते ३० एकर शासकिय जमीनीवर ८ ते १० कंटेनर यार्ड बांधून विनापरवानगी त्याचा वापर करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर बांधकाम निष्कासित करून विनापरवानगी त्याचा वापर करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मौजे शिरढोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सं.क्र.२६० मधील जमिनी या शासकीय जमिनी नसून खाजगी मालकीच्या आहेत. या जागेवर अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत. अनधिकृत बांधकामे कंटेनर यार्डचे नसून वेअर हाऊसचे असल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी कळविले आहे. त्याचा विनापरवानगी वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात दिनांक २६/२/२०१८ रोजी सिडकोने संबंधितास नोटिस बजावली आहे. तसेच दिनांक ५/३/२०१८ रोजी कागदपत्रे सादर करण्यासाठी संबंधितास कळविण्यात आले आहे. या जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत सिडकोच्या स्तरावर सविस्तर चौकशी सुरु आहे. तसेच सदर अनधिकृत बांधकामांचा विनापरवाना वापर केल्याबद्दल जिल्हाधिकारी, रायगड यांनी संबंधितांकडून दंडाची रक्कम रुपये १०,४३,७५०/- वसुल केलेली आहे व उर्वरीत रक्कम रुपये १३,८३,६६०/- च्या वसुलीची नोटीस संबंधितास देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील न्यू पनवेल भागात इमारतींचे बेकायदेशीर बांधकाम झाल्याबाबत

**(४१) * ११५६९१ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील न्यू पनवेल भागात निलकंठ लँडमार्क, ओरीयन मॉल व या सारख्या इतर व्यावसायीक इमारतींचे बेकायदेशीर बांधकाम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • निलकंठ लँडमार्कला एकूण ४५६६.८१ चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली. त्यापैकी ४१७१.९० चौ.मी. क्षेत्रावर बांधकाम पुर्ण करण्यात आले.

• उपरोक्त ४५६६.८१ चौ.मी. क्षेत्रापैकी २५० चौ.मी. क्षेत्र रेल्वेने भूसंपादित केले असतानाही बांधकाम परवानगी दिली, या मुद्द्याबाबत श्री.यशवंत भगत यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ११५/२००९ दाखल केली.

• सदर जनहित याचिकेत मा.उच्च न्यायालयाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या चौकशी अहवालात उपरोक्त २५० चौ.मी. क्षेत्राचे भूसंपादन झाल्याचे तथापि, सदर जमिन निश्चित कोणत्या ठिकाणी आहे याबाबत अनुमान दर्शविता येत नसल्याचे नमुद केले.

• विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अहवालास अनुसरून तत्कालीन नगरपरिषदेने विकासाची परवानगी व भोगवटा दाखला रद्द केला. या आदेशा विरुध्द विकासक मे.रुपा असोसिएट यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४५२/२०१६ दाखल केली.

• मा.उच्च न्यायालयाने नगरपरिषदेच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

• सद्य:स्थितीत उपरोक्त जनहित याचिका क्र. ११५/२००९ व रिट याचिका क्र. ४५२/२०१६ मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.

• ओरीयन मॉलच्या ६ भूखंडावरील एकूण २०७७२.३९ चौ.मी. क्षेत्रासाठी बांधकाम परवानगी देण्यात आली. त्यापैकी १९०८८.०७ चौ.मी. या क्षेत्रावर बांधकाम पुर्ण करण्यात आले.

• उपरोक्त ६ भूखंडापैकी एका भूखंडातील २३५२ चौ.मी. च्या क्षेत्राच्या मालकी हक्काबाबत श्री.विजयकुमार जोशी यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४४४५/२०१३ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

• अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त तक्रारीवर महानगरपालिकेमार्फत नियमित कार्यवाही करण्यात येते, असे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, सी.आर.झेड., पर्यावरण, विमानतळ प्राधिकरण, वन विभाग यांच्या जमिनींवरील झोपडपट्ट्यांकरिता शौचालय बांधण्यास ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत

**(४२) * ११५७४७ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, सी.आर.झेड., पर्यावरण, विमानतळ प्राधिकरण, वन विभाग यांच्या जमिनींवरील अस्तित्वात असलेल्या झोपडपट्ट्यांकरिता शौचालय बांधण्यास किंवा त्याची दुरुस्ती करण्यास ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याने केंद्र शासनाच्या नगरविकास खात्याकडे दिनांक ४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या संचालकांनी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्यास दिनांक १० जून, २०१५ रोजी रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, हायवे ऑथॉरिटी व विमानतळ प्राधिकरण येथे शौचालय बांधण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र घेणे गरजेचे नाही असे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आमदार निधीतून किंवा खासदार निधीतून म्हाडामार्फत अस्तित्वात असलेली ना-दुरुस्त शौचालये तोडून पुन्हा बांधताना विमानतळ प्राधिकरण, रेल्वे व इतर प्राधिकरणे सदर शौचालयाच्या बांधकामास अटकाव करतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांनी शौचालय बांधण्यास ना हरकत प्रमाणपत्राची गरज नाही अशा दिलेल्या दिशा-निर्देशाचे उल्लंघन करून सदर प्राधिकरण शौचालयाच्या बांधकामास अटकाव करतात याबाबत शासन काय उपाययोजना करणार वा करित आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या अखत्यारीतील रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, सी.आर.झेड., पर्यावरण, कस्टम, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुरातत्त्व, वन विभाग इत्यादी प्राधिकरणाच्या जमिनीवर शौचालय बांधकाम करण्याबाबत नगर विकास विभागाने दिनांक ४ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे मार्गदर्शन मागविले होते.

(२) संचालक, स्वच्छ भारत अभियान यांनी दिनांक १० जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त प्राधिकरणाच्या जमिनीवर शौचालय बांधकाम करण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे, हे खरे आहे.

(३) मा.संसद सदस्य तसेच मा.विधानमंडळ सदस्य यांच्या स्थानिक विकास निधीतून शौचालयाचे बांधकाम व दुरूस्ती करताना संबंधित प्राधिकरणाचे आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र विहीत वेळेत मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(४) संचालक, स्वच्छ भारत अभियान यांनी दिनांक १० जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये शौचालय बांधकाम करताना संबंधित प्राधिकरणाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याबाबत कळविल्यानुसार सर्व संबंधित प्राधिकरणांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मा.मुख्य सचिव महोदयांच्या स्तरावर याबाबत सर्व संबंधितांची बैठक आयोजित करून सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार व त्यांचे नातेवाईक यांनी मुंबई क्राईम ब्रँचकडे विकासक समीर भोजवानी यांच्या विरोधात तक्रारी केल्याबाबत

**(४३) * १०७०६१ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार व सायरा बानो तसेच त्यांचे नातेवाईक यांनी मुंबई क्राईम ब्रँच (आर्थिक घोटाळा विभाग) यांचेकडे विकासक समीर भोजवानी यांचे विरोधात धाकदपटशहा, छळवणूक, शस्त्रांचा धाक दाखवून गुंडगिरी करणे व बेकायदेशीररित्या बंगल्याचा ताबा मिळविणे अशा प्रकारची लेखी तक्रार केल्यानंतर पोलीसांनी समीर भोजवानी यांच्या घरी टाकलेल्या छाप्यात अनेक बेकायदेशीर शस्त्रे सापडल्याची बाब दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने दिलीपकुमार व सायरा बानो यांच्या बाजुने निकाल देऊन विकासक भोजवानी यांचा दावा फेटाळून लावला तरीही, भोजवानी यांनी या ज्येष्ठ अभिनेता दाम्पत्याला वारंवार धमक्या दिल्याचे तपासात निष्पन्न होऊनही संबंधीत विकासकाविरोधात कॅफेसोपा सारख्या कायद्या अंतर्गत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार सदर विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी खार पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ०५/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. ०२/१८ अन्वये सुरु आहे.

तसेच, गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीच्या घरामध्ये १६ प्राणघातक धारदार शस्त्रे मिळुन आल्याने, त्यासंदर्भात स्वतंत्ररित्या बांद्रा पोलीस स्टेशन येथे स्थानिक गुन्हा रजि. क्र. ०८/१८, कलम ४ व २५ भारतीय हत्यार कायदा

१९५९ सह कलम ३७ (१)(अ) म.पो. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मेळघाट धारणमाहू (जि.अमरावती) येथून आठ आदिवासी शाळकरी मुलांचे पुण्यातील एका कारखान्याच्या कामासाठी अपहरण केल्याबाबत

**(४४) * ११५२८९ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) धारणमाहू येथून आठ आदिवासी शाळकरी मुलांचे पुण्यातील एका कारखान्याच्या कामासाठी अपहरण केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटातून रोजगाराचे आमिष दाखवून आदीवासींना परप्रांतात किंवा मोठ्या शहरात घेऊन जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‍नुसार सदर बाब थांबवण्यासाठी व संबधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) अशा प्रकारची तक्रार धारणी, चिखलदरा या मेळघाटातील पोलीस स्टेशन येथे प्राप्त नाही.

(३) धारणमाहू या गावातील ८ आदिवासी शाळकरी मुलांचे अपहरण झाल्याबाबत पोलीस स्टेशन धारणी येथे दिनांक १८.०१.२०१८ रोजी अप. क्र.१३/१८, कलम ३६३,३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद असून यामधील २ आरोपीतांना अटक करण्यात आली होती. त्या ८ मुलांची सुटका करण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## नाशिक पूणे महामार्गावरील जम्मू पंजाब ढाबा (संगमनेर) येथे ऑईलची चोरी करतांना आठ जणांना अटक केल्याबाबत

**(४५) * १०५५१० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पूणे महामार्गावरील जम्मू पंजाब ढाबा (संगमनेर) येथे फर्नेस ऑईलची चोरी करताना व टँकर मधून ऑईल काढून दुसऱ्या टँकरमध्ये भरताना संगमनेर पोलिसांनी आठ जणांना अटक केल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलीसांनी रुपये ५८ लाख किंमतीचे आठ टँकर व फर्नेस ऑइल जप्त केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील ६ टँकरचालक फरार झालेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) संगमनेर पोलीसांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन पोलीसांनी दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी सुमारे ०२.३० चे सुमारास नाशिक पुणे महामार्गावरील जम्मु पंजाब वैष्णव ढाब्याचे समोरील (संगमनेर) रिकाम्या प्लॉटमध्ये छापा टाकला असता आरोपीं हे संगनमताने फर्निश ऑईलची चोरी करुन ते विक्री करीत असतांना मिळून आल्याने संगमनेर पोलीसांनी सदर ८ आरोपींना (३ टँकरचालकांसह) अटक केली आहे.

(२) हे खरे आहे. याप्रकरणी पोलीसांनी रु. ५८,३०,०००/- किंमतीचे ८ टँकर व फर्निश ऑईल जप्त केले आहे.

(३) सदर गुन्ह्यात तीन टँकरचालक असून त्यांना त्याच दिवशी अटक करण्यांत आली आहे. गुन्ह्यातील इतर ६ ते ७ आरोपी फरार आहेत.

(४) या प्रकरणी संगमनेर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२/२०१८, भा.दं.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आठ आरोपींना दिनांक १२.०१.२०१८ रोजी अटक करण्यांत आली असून त्यांना दिनांक १६.०१.२०१८ पर्यंत पोलीस कोठडीत होते. सध्या आरोपी जामीनावर आहेत. मा.न्यायालयाच्या आदेशाने जप्त मुद्देमाल मूळ मालकांना परत करण्यांत आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई बँकेतील रुपये १२३ कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याबाबत

**(४६) * १०८२७६ श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई बँकेतील रुपये १२३ कोटींच्या घोटाळ्या प्रकरणी गुन्हा दाखल करणाऱ्या मुंबई पोलीसांच्या आर्थिक गुन्हे विभागाने डिझास्टर रिकव्हरी साइट मधील बँकाविरोधातील तक्रारीनुसार झालेल्या गैरव्यवहाराबाबत अद्यापी कोणतीही कारवाई केली नसल्याची बाब दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मूळात बनावट असलेल्या अनेक मंजूर संस्थांचे पुनरुज्जीवन करुन त्यांना लाखो रुपयांची कर्जे देण्यात मुंबई बँकेचे रुपये १८३ कोटी अडकल्याचा अहवाल आर्थिक गुन्हे विभागाला सादर होऊनही या विभागाने अद्यापी कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सुहास पाटील यांनी आपल्या अहवालात संचालक व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची शिफारस करुनही, संचालक व अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी अनेक व्यक्ती, सामाजिक संस्था यांनी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागासह नाबार्ड, रिझर्व्ह बँक इ. संस्थांकडे या बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबत तक्रारी केल्या असूनही, या बँकेतील

अनेक मजूर संस्था अस्तित्वात नसतानाही त्यांना देण्यात आलेल्या बोगस कर्जाची पूर्णत: चौकशी करण्यास होत असलेल्या विलंबास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.क्र. २१/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), २१४ प्रमाणे गुन्हा नोंद असुन नमुद गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(२) उपरोक्त नमुद गुन्ह्याच्या फिर्यादीमध्ये सन २०११-१२ मध्ये मुंबई बँकेने बनावट/बोगस कागदपत्रे तयार करुन ७४ मजुर संस्थांना एकाच दिवशी बँकेचे सभासदत्व दिले आहे अशी तक्रार आहे.

नमुद गुन्ह्यात झालेल्या तपासात मजुर सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवन करुन त्यांना दिलेल्या कर्जाचे १८३ कोटी रुपये त्यांच्याकडे अडकले असल्याबाबतची कोणतीही माहिती/अहवाल आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे प्राप्त नाही. मात्र, एकाच दिवशी सभासदत्व मंजुर केलेल्या ७१ सहकारी संस्थांपैकी एकाच संस्थेला रु. १५ लाख कर्ज दिल्याचे व ते खाते नियमित असल्याची माहिती बँकेकडून प्राप्त आहे. यासंदर्भात अधिक तपास सुरु आहे.
(३) तत्कालीन जिल्हा उपनिबंधक सुभाष पाटील यांनी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाची चौकशी केली आहे. मात्र सदर चौकशीमध्ये संचालक व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची शिफारस केलेली नाही.
(४) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८९-ऐ खालील तपासणी अहवालात मजुर संस्था अस्तित्वात नसतानाही त्यांना देण्यात आलेल्या बोगस कर्जाबाबत उल्लेख आढळुन आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील छावणी परिसरात गॅस्ट्रोची लागण झाल्याबाबत

**(४७) * १११७०९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील छावणी परिसरात गॅस्ट्रोच्या रुग्णांची संख्या सुमारे ३ हजारांवर पोहचली असल्याचे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे अडीचशे बालकांनाही गॅस्ट्रोची लागण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गॅस्ट्रोची साथ नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

औरंगाबाद छावणी परिसरात दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी गॅस्ट्रो उद्रेकाची लागण झाली होती. दिनांक १० नोव्हेंबर ते २१नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत ७४३९ रुग्ण आढळुन आले.

(२) गॅस्ट्रो उद्रेकादरम्यान ६०४ बालकांवर उपचार करण्यात आले ही वस्तुस्थिती आहे.

(३) औरंगाबाद छावणी परिसरातील गॅस्ट्रो उद्रेक नियंत्रणात आणण्यासाठी औरंगाबाद छावणी मंडळ, औरंगाबाद महानगरपालिका व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या यंत्रणेमार्फत खालीलप्रमाणे उपचारात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या :-

- आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत साथग्रस्त भागात सर्वेक्षण,
- उपचार व सर्वेक्षणासाठी अतिरिक्त मनुष्यबळ आणि औषध पुरवठा,

• पाणी शुध्दीकरणासाठी घरोघरी मेडिक्लोर द्रावणाचे तसेच ओ.आर.एस. पाकीटांचे वाटप,

• प्रयोगशाळेद्वारे पाणी व टी.सी.एल. पावडरची तपासणी,

• रुग्णांवर तातडीने आणि प्रभावी उपचार,

• पाणी पुरवठा तात्पुरता बंद करुन जलवाहिनी दुरुस्त करण्यात आली. खंडीत पाणीपुरवठा कालावधीत पर्यायी शुध्द पाणीपुरवठा करण्यात आला,

• गृहभेटीद्वारे परिसरातील लोकांचे वैयक्तिक व परिसर स्वच्छता, पिण्याच्या पाण्याबाबत घ्यावयाची काळजी यासंदर्भात प्रबोधन,

• गृह भेटीद्वारे हस्तपत्रिका वाटप.

दिनांक २२ नोव्हेबर २०१७ पर्यंत गॅस्ट्रो साथ उद्रेक नियंत्रणात आला आहे. तद्नंतर आजपर्यंत गॅस्ट्रो बाधित रुग्ण आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील नैसर्गिक नाले बंदिस्त करून इमारती बांधण्यात आल्याबाबत

**(४८) * १०६८४२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील नैसर्गिक नाले बंदिस्त करून त्यावर गुरुदत्त हाईट्स, मांजर्ली, मनोहर विकास हेन्द्रेपाडा, कृष्णा इस्टेट हेन्द्रेपाडा व इतर अनेक इमारती बांधण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार नैसर्गिक भराव करून बांधण्यात आलेल्या इमारतींवर, विकासकावर व बांधकाम परवानगी देणाऱ्या नगरपालिकेच्या

सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुख्याधिकारी यांच्या अहवालानुसार कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नैसर्गिक नाले कुठेही बंदिस्त केलेले नाहीत. तथापि, नाल्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एका ठिकाणी संबंधित विकासकाने व एका ठिकाणी नगरपरिषदेने संरक्षक भिंत बांधलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

• "गुरुदत्त हाईट्स" अशा नावाची इमारत कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीत नाही.

• हेंद्रेपाडा भागातील "मनोहर विकास" या इमारतीलगत नाला आहे. तथापि, तेथील नाल्यालगत संरक्षक भिंतीचे बांधकाम नगरपरिषदेमार्फत करण्यात आले आहे.

• हेंद्रेपाडा या भागात असलेल्या "कृष्णा इस्टेट" इमारतीलगत नाला नाही. तथापि, सदर इमारतीलगत अन्य एका विकासकामार्फत बांधण्यात येणाऱ्या इमारतीच्या बाजूला नाला आहे. सदर नाल्यालगत नगरपरिषदेने दिलेल्या परवानगीनुसार विकासकाने संरक्षक भिंत बांधली आहे, ही वस्तूस्थिती आहे.

• नगरपरिषद हद्दीत नैसर्गिक नाल्यावर भराव टाकून कुठेही इमारत बांधलेली नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बांद्रा कुर्ला संकुलातील मे.नमन हॉटेल्स प्रा.लि यांनी महानगर विकास प्राधिकारणास अदा करावयाची रक्कम थकविल्याबाबत

**(४९) * ११४९०६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा कुर्ला संकुलातील (मुंबई) प्लॉट नं C ५७ व C ५८ या जी ब्लॉक मधील प्लॉटसाठी मुंबई महानगर विकास प्राधिकारणास अदा करावयाची ३२

कोटी रुपये मे.नमन हॉटेल्स प्रा.लि यांनी थकविले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम वसूल करण्याकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दूर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर रक्कम वसूल करण्याबाबत तसेच दूर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील मे. नमन हॉटेल्स प्रा. लि. यांना वितरीत केलेल्या भूखंड क्र. सी-५७ व ५८ वरील इमारतीचे बांधकाम पूर्णत्वासाठी निर्धारित ४ वर्षांच्या कालावधीत बांधकाम पूर्ण न केल्यामुळे, आकारण्यात आलेल्या अतिरिक्त अधिमूल्यापैकी भाडेपट्टेदाराकडून रु. ३५.४७ कोटी दिनांक ३१/०१/२०१८ अखेर इतके अधिमूल्याचा भरणा बाकी आहे.

(२), (३) व (४) मे. नमन हॉटेल्स प्रा. लि. यांनी प्रश्नाधिन भूखंडावरील (सी-५७ व ५८) इमारतींचे बांधकाम निर्धारित चार वर्षाच्या कालावधीत पूर्ण न केल्यामुळे आकारलेल्या अतिरिक्त अधिमुल्याच्या रक्कमेचा भरणा न केल्यामुळे त्यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने भाडेपट्टेदारास भूखंड परत घेण्याबाबत रिझंप्शनची नोटीस दिनांक १२/०९/२०१७ रोजी दिलेली होती. सदर नोटीसीच्या विरोधात मे. नमन हॉटेल्स प्रा. लि. (सी-५७ व ५८) यांनी रिझम्पशनच्या नोटीस विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दावा (WP No. ३२०९/१७) दाखल केला आहे.

-----------------

## चिकलठाणा (जि.औरंगाबाद) येथील विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत

**(५०) * ११४८५४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला**

**गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (जि.औरंगाबाद) विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत व त्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला भूसंपादन संस्था म्हणून नियुक्त केल्याबाबतचे आदेश शासनाने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारस निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहर परिसरात शासनाने रुपये ३ हजार कोटी खर्च करुन उद्योजकांसाठी "ऑरिकसिटी" तयार करण्यात येत असून आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी विमानतळ विस्तारीकरणाची मागणी स्थानिक व देशपातळीवरील उद्योजकांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने विमानतळ विस्तारीकरणाचा निर्णय घेऊन त्यासाठी रुपये २०० कोटी उपलब्ध करुन देण्याचे जाहीर केले होते, परंतू याबाबत अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे त्यासाठी आता रुपये ६०० कोटी खर्च करावे लागणार असल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. हे खरे आहे.

(२) विमानतळ विस्तारीकरणाच्या मागणीसंदर्भात निवेदन स्थानिक उद्योजकांच्या संस्थेकडून शासनास प्राप्त झालेले आहे.

(३) औरंगाबाद विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी रु.२०० कोटी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि, विस्तारीकरणासाठी आवश्यक जमिनीची मोजणी केल्यानंतरच खर्चाचा आकडा निश्चित होईल. सद्यस्थितीत विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी जमिनीची मोजणी करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.